
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे / अंक २ / फेब्रुवारी २०२३

## संपादकीय

### 'पाणथळ भूमी' दिनाचे महत्त्व

फेब्रुवारी महिन्याच्या २ तारखेला 'जागतिक पाणथळ भूमी दिन' (World's Wetlands Day) साजरा करण्यात आला. जलाशयाच्या जवळ असलेली ओलसर जागा म्हणजे पाणथळ होय. भारताला मोठा समुद्र किनारा लाभला आहे. त्यामुळे भारतातील पाणथळाचे क्षेत्र फारच मोठे आहे. केवळ महाराष्ट्र राज्याचा जरी विचार केला तरी आपल्या लक्षात येईल की, महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर शेकडो किलोमीटर एवढ्या लांबीचा समुद्रकिनारा आहे. या समुद्र किनाऱ्याला जोडून अनेक 'पाणथळी' आपल्याला पाहायला मिळतात. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या इतर भागांत देखील आपल्याला पाणथळ भूमी आढळते.

पाणथळ म्हणजे दलदलीची जागा. ती निरूपयोगी असल्याचे मत समाजात प्रचलित आहे. म्हणून शहराजवळ असलेल्या पाणथळी बुजवून त्यावर इमारती बांधल्या जातात. खेड्याजवळ असलेल्या पाणथळीत माती पसरून ती शेतीयोग्य बनविली जाते. काही ठिकाणी तर ही जागा रोजचा निर्माण होणारा कचरा टाकण्यासाठी वापरली जाते. परंतु एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे की, पाणथळीची जागा अतिशय महत्त्वाची असते. पर्यावरणात संतुलन ठेवण्याचे उपयुक्त कार्य या पाणथळी करतात. या दलदल असलेल्या जमिनीत कांदळवनांचा विकास होतो. इतर वनस्पतींप्रमाणेच ही कांदळवने ऑक्सिजन निर्मितीचे महत्त्वाचे कार्य करतात. त्याचबरोबर समुद्रात निर्माण होणाऱ्या मोठ्या लाटेपासून ते आपले रक्षण करतात. रोजच्या भरती ओहोटीचे आपल्याला फारसे काही वाटत नाही. परंतु जेव्हा सुनामीसारख्या घटनांनी समुद्रात मोठ्या लाटा निर्माण होतात तेव्हा हीच कांदळवने आपले रक्षण करतात. लाटेला जमिनीवर यायला ते विरोध करतात. त्याहीपेक्षा महत्त्वाचे हे की, कांदळवने अनेक प्रकारच्या जलचर प्राण्यांना आसरा देतात. वेगवेगळ्या प्रकारचे मासे, खेकडे, तसेच इतर जीव या झाडांच्या मुळांच्या आधाराने आपले जीवन जगतात. त्यामुळे आपण जेव्हा कांदळवने नष्ट करतो तेव्हा या प्राण्यांच्या अधिवासावर हल्ला करीत असतो.

पाणथळाचे महत्त्व ओळखून ते वाचविण्यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न होऊ लागले आहेत. २ फेब्रुवारी १९७१ रोजी इराणच्या रामसर शहरात हे कार्य पुढे नेण्यासाठी एका जागतिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हापासून २ फेब्रुवारी हा दिवस 'पाणथळ भूमी दिन' (Wetlands Day) म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. दरवर्षी यासाठी एक विषय घेण्यात येतो. २०२३ या वर्षीच्या पाणथळ दिनाचा विषय होता 'पाणथळांचे पुनरुज्जीवनाची

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

ही वेळ आहे’ (It is time for wetlands restoration). या दृष्टीने जगात सर्वत्र कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. रामसर येथे भरलेल्या सभेत आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला होता. जगातील महत्त्वाच्या पाणथळींना ‘रामसर स्थळ’ म्हणून नामकरण केले जावे हा तो निर्णय होता. त्यानुसार जगातील वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या पाणथळ भूमींचे निरीक्षण करून, तेथील जैवविविधतेचा अभ्यास करून, योग्य अशा स्थळांना ‘रामसर पाणथळ भूमी’ असे नामकरण करण्यात येत आहे. ओरीसा राज्यातील चिलका सरोवराला याचा पहिला मान मिळाला. मागील वर्षात ही यादी वाढत गेली आहे. भारतातील ५०हून जास्त पाणथळ ठिकाणांना रामसर पाणथळ म्हणून गौरविण्यात आले आहे. त्यात महाराष्ट्रातील तीन स्थळांचा समावेश आहे. नाशिकजवळील नांदूर माधवेश्वर आणि बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर यांना रामसर स्थळांचा मान मिळालेला आहे. नुकताच ठाणे खाडी परिसराला हा किताब देण्यात आला आहे.

ठाणे शहरालगत एक चांगले पाणथळ आहे. या ठिकाणी अनेक जीवजंतू वास करतात. त्यामुळे युरोपातील फ्लेमिंगो पक्षी इथे दरवर्षी येतात. विशेषत: जेव्हा युरोपात खूप थंडी पडते तेव्हा हे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून इथे येतात. काही पक्षी तर इराण, अफगाणिस्तान या लांबच्या देशांतून येतात. वर्षातील काही महिने त्यांचा इथे मुक्काम असतो. ठाणे खाडीतील हे पक्षी पाहणे म्हणजे एक पर्वणीच असते. युरोपातील हिवाळा संपताच हे पक्षी मायदेशी परत जातात. ठाणे खाडीतील जैवविविधता लक्षात घेऊन या जागेचे ‘रामसर स्थळ’ असे नामानिधान २०२१मध्ये करण्यात आले. या स्थळाचे संरक्षण करण्याचे प्रयत्न महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या वतीने २०१२मध्ये एक विशेष विभाग निर्माण करण्यात आला आहे. या विभागाने पाणथळ भूमींचे संरक्षण करण्यासाठी काही योजना आखल्या आहेत. या कार्याला काही स्थानिक स्वयंसेवी संघटनांनी आपले सहकार्य देऊ केले आहे. या पाणथळांच्या मदतीने स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती करण्याचे प्रयत्न होत आहेत. अनेक अल्प भू-धारक शेतकऱ्यांना कोळंबीची लहान लहान पिल्ले देऊन ती जोपासण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. त्याचबरोबर या परिसरात वाढणाऱ्या माशांची पैदास वाढविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. या प्रयत्नांना लवकरच चांगले यश येईल अशी आशा बाळगू या.

शाश्वत विकास साधायचा असेल तर पाणथळ भूमीचे रक्षण करण्याची गरज आहे हे आता पर्यावरण वाद्यांना चांगलेच कळले आहे. या कामाला गती देण्यासाठी स्वित्झर्लंडमधील दिशेला शहरात एक केंद्रीय कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. या कार्यालयाच्यावतीने जगभर जनजागृतीसाठी कार्यक्रम आयोजित केले जातात. याखेरीज स्थानिक स्तरावरदेखील अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. ‘पाणथळ भूमी दिन’ साजरा करणे हा या कार्यक्रमाचाच एकभाग आहे. या कार्यक्रमात लोकांनी मोठ्या संख्येने सहभागी होणे गरजेचे आहे. पाणथळ संरक्षण ही एक चळवळ झाली पाहिजे. या चळवळीत पुढच्या पिढीला सामावून घेणे अत्यंत गरजेचे आहे. दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्याची प्रथा बऱ्याच ठिकाणी प्रचलित आहे. अनेक शाळा त्या दिवशी विद्यार्थ्यांना जवळ असलेल्या प्रेक्षणीय स्थळाला भेट देण्यासाठी घेऊन जातात. या शाळांनी मधूनमधून पाणथळांना भेटी द्याव्यात असे मी सुचवू इच्छितो. ही ठिकाणे म्हणजे माहितीचे भांडार आहेत. या ठिकाणाला भेट देऊन विद्यार्थी खूप उपयुक्त माहिती गोळा करू शकतात. त्यातूनच अशा स्थळांची काळजी घेण्याची इच्छा त्यांच्या मनात रुजायला मदत होईल. नवीन पिढीला अशा संस्कारांची नितांत गरज आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●



# व्ही.पी.एम्. दिशा


**वर्ष चोविसावे/अंक २/फेब्रुवारी २०२३**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) अर्वाचीन दंतकथा | नरेंद्र गोळे | २ |
| ३) रेवडी संस्कृती | चन्द्रशेखर टिळक | ६ |
| ४) डब्ल्यू बी येट्स व जॉन किट्सची कविता | डॉ. आनंद कुलकर्णी | १० |
| ५) समीक्षा - डीएनए चा आक्रोश | डॉ. रंजन गर्गे | १२ |
| ६) एक अविस्मरणीय सहभाग | सौ. कल्पना बोरवणकर | १३ |
| ७) गोदावरी - कथेपलीकडचा सिनेमा | सुहास किर्लोस्कर | १४ |
| ८) गीतार्थे विश्वभरू, मांडू आनंदाचे आवरूं ! | विनीता तेलंग | १६ |
| ९) दुर्गाबाई भागवत : समूर्त नि:पक्षपाती विचारनिष्ठा | प्रमोद वसंत बापट | १९ |
| १०) मराठी भाषा गौरव दिन | सौ. साधना योगेश जोशी | २१ |
| ११) परिसर वार्ता | संकलित | २६ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अर्वाचीन दंतकथा

*करोना काळात प्रत्यक्ष घडलेल्या घटनेवर आधारीत लेखकाने लिहिलेला सुरस वृत्तांत – संपादक*

१९८०-९० दरम्यानचा काळ होता. मी मुंबईत नोकरी लागल्याने लोकलने मुंबईस जाऊ लागलेलो होतो. संध्याकाळी लोकलमधून परततांना एक सरदारजी मोठ्यामोठ्याने बोलत जाहिरात करत असे. 'आपने सुना होगा। एक सरदारजी लोकल में आता है। दुखता दांत तुरंत निकाल देता है।' अशा प्रकारे तो स्वतःची जाहिरात स्वतःच करत असे. कमालीच्या दांतदुखीने त्रस्त असे लोक रोजच लोकलने प्रवास करत असतात. असा त्याचा अनुभव होता. अत्यंत किरकोळ मोबदल्यात तो दुखरा दात सहज काढून हातात देत असे. अशा घटना नजरेसमोर घडल्याचे अनेकांनी पाहिलेलेही होते. थोडक्यात काय की, लोकलने प्रवास करणाऱ्यांचे दातांचे दुःख निवारण्याचे अत्यंत लोकोपयोगी कार्य तो किरकोळ रकमेत सहजच करून देत असे. मात्र दातांचे दुःख नाहीसे झाल्याची खबर कानोकानी लागत नसे. इतर सर्व प्रवासी जणू काही, काही घडलेच नाही असे, आपापल्या घराकडे वाट चालत असत. निराळे काही घडले आहे अशी खुटखुट कुणालाही, कधीही लागतच नसे.

आता एकविसाव्या शतकातील एकविसावे वर्ष सुरू झाले आहे. काळ करोनाचा आहे. खरे तर गेल्या जानेवारीपासूनच माझे काही दात दुखत असत. सुरुवातीस दातांचे सर्वच दवाखाने बंद होते म्हणून माझा अगदीच निरुपाय झाला. मग कुठे विको वज्रदंतीने दात घास, कुठे वेदनाशामक गोळ्या खा, कुठे निर्जंतुकीकारक औषधे वापर, कुठे आवळ्याची सुपारी दातांत धरून ठेव असल्या घरगुती उपायांनी दुःख सोसले. जरा कुठे दातांचे दवाखाने उघडल्याची कुणकुण लागली तेव्हा ताबडतोब कौटुंबिक दंतवैद्याकडे, 'केवळ वेळ ठरवूनच (ओन्ली बाय अपॉन्टमेंट)' आधारावर अनेक खेपा करून दुःख आटोक्यात आणले. इतर अनेक दातांना पडलेली मोठाली भगदाडे बुजवून झाली. अनेकांवर दंतमूळोपचार (रूट कॅनॉल ट्रिटमेंट) करून झाले. मात्र खालच्या अखेरच्या (अक्कल) दाढेला वाचवण्याचे कोणतेही उपाय उपलब्ध नाहीत, अशी गुप्त वार्ता अखेर बाहेर पडलीच. बरे बाबा. मग करा एकदाची तिची माझी फारकत! 'अनेकदा माझे अ-हितचिंतक माझी 'अक्कल' काढतच असतात! आता तुम्ही अक्कलदाढच काढून टाका म्हणजे या दुःखातून सुटका होईल एकदाची', असे साकडे मी माझ्या कौटुंबिक दंतवैद्यास घातले. त्यावर मला नव्यानेच कळले असे की, ते त्यातले तज्ज्ञ नाहीत. दातांची शल्यक्रिया (सर्जरी) करणारे निराळेच असतात. त्यांनी तशा विशेषज्ञांचे नाव पत्ता देऊन मला बोलवले.

मग विशेषज्ञांची वेळ घेणे आलेच. आता प्रत्येक ठिकाणी मुस्की बांधून जाणे. तिथे हस्तधावन करवून घेणे. शरीरातील 'प्राणा'ची (ऑक्सिमीटरने मोजतात त्या हो) त्यांना खात्री करवून देणे. या गोष्टी तर कराव्याच लागतात. तेव्हा त्याबद्दल निराळे काय सांगायचे! मग केवळ परिस्थितीचे अवलोकन करायलाच 'विशेष' मानधन खर्ची घालून, त्यांचे मत जाणून घ्यावे लागले. त्यांनी घोषित केले की, मी योग्य तज्ज्ञाकडेच आलेलो आहे. मात्र उपचारांची वेळ काही द्यायला तयार नाही. मी विचारले 'का?' तर म्हणे, 'अखेर ही शल्यक्रिया आहे!' तुमच्या शारीरिक परिस्थितीला मानवेल की नाही, याबाबत एका 'शरीररोग विशेषज्ञा'ची शिफारस

आणा. सोबतच काही रक्त तपासणी करवून घ्या. ही घ्या यादी. हे सारे अहवाल मग मला 'कायप्पा (मराठीत वॉटसॅप)' वर पाठवा. लगेचच आपण वेळ ठरवून टाकू. अशा प्रकारे मला अत्यंत सोपे वाटणारे प्रकरण हळूहळू पण निश्चितपणे क्लिष्ट होत चालले होते.

आता शोध करावा लागला एका 'शरीररोग विशेषज्ञा'चा. तोही तपास लागला. प्रयत्न केल्यास काय साध्य होत नाही! मग त्यांचीही वेळ ठरवून भेट घ्यावी लागली. पुन्हा हस्तधावन. पुन्हा 'प्राण' निश्चिती. पुन्हा मुस्की बांधून रांगेत प्रतीक्षा. सारे यथावकाश पार पडल्यावर 'विशेषज्ञां'समोर पेशी झाली. त्यांनी स्वतः 'सर्वांगाच्छादक व्यक्तिगत सुरक्षा कवचात्मक पोशाख' (यालाच शुद्ध मराठीत 'पी.पी.ई.कीट' असा सुटसुटित शब्दही आहे खरे तर!) घातलेला होता. चेहऱ्यावर 'उत्सर्ग प्रतिबंधक सुरक्षा ढाल' (म्हणजे 'फेस शिल्ड' हो! चढवलेले होते. टेबलाच्या मागे ते बसलेले. समोर आम्ही. मध्ये 'अप्रत्यास्थाचा (प्लॅस्टिकचाच खरे तर)' पारदर्शक पडदा उभारलेला. त्यांनी 'शल्यक्रियेपूर्व स्वस्थता (प्री-सर्जिकल फिटनेस)' असण्याबाबतची आमची गरज, पूर्ण अनुकंपेने जाणून घेतली. काळ 'कोरोना'चा असल्याची समज दृढ करून दिली. रोज कोणती औषधे घेता, कधीपासून सुरू झाली इत्यादींची झाडाझडती घेतली. मग शारीरिक तपास हाती घेतला.

तपास टेबलावर आडवे व्हा. दीर्घ श्वास घ्या. सोडा. रक्तदाब मोजा. रक्तदाबाचा इतिहास जाणून घ्या. छातीत दुखते का विचारा. स्पंदसंवेदक (स्टेथोस्कोप) पाठीवर ठेवून श्वासोच्छ्वासाचा वेध घ्या. दम लागतो का विचारा. चेहऱ्यावर सूज दिसते का पाहा. पायावर सूज आहे का तपासा. मधुमेह आहे का माहीत करून घ्या. हे सारे बैजवार नोंदवा. हृदयालेख (ई.सी.जी.) काढा. क्ष-किरणचित्र काढा. म्हटलं दंतवैद्यांनी काढले आहे. नाही! छातीचे. मी म्हटलं, दात काढायचा आहे हो! तरीही छातीचे क्ष-किरणचित्र काढावेच लागेल. मूत्र-तपासही करावाच लागेल. एवढेच नाही तर 'कोविड' नसल्याची खात्रीही करवून घ्यावीच लागेल. असा अमूल्य सल्ला हाती आला.

मग रीतसर रक्त तपास, क्ष-किरण तपास सगळ्यांच्या वेळा घेतल्या. सगळ्या ठिकाणी मुस्की बांधून जाणे. तिथे हस्तधावन करवून घेणे. शरीरातील 'प्राणा'ची त्यांना खात्री करवून देणे ओघानेच आले. अहवाल मिळण्याच्या वेळा सांगितल्या गेल्या. मोबदला आधीच रोख वसूल करण्यात आला. यथावकाश अहवालही हाती आले.

इतर चाचण्यांचे ठीक आहे. मात्र 'कोविड'ची 'आर.टी.पी.सी.आर' नावाची चाचणी केल्यापासून जिवाला घोरच लागला. काळच असा होता. 'कोविड'ची चाचणी करवून घेतली आणि जर तिचा निष्कर्ष 'होकारात्मक' असेल तर घरी फोनच येत असे महापालिकेचा. माझी चाचणी शनिवारी झालेली. अहवाल सोमवारी सकाळी ११ वाजता मिळणार होता. मात्र महापालिकेचा फोन कधीही येऊ शकत होता. लोक तर असेही सांगत होते की, 'कोविड' नसलेल्यालाही हेतुतः आहे असे सांगतात. भरती करवून घेतात. खासगी रुग्णालयात भरती होण्याचे सल्ले देतात. खासगी रुग्णालयांतून '४० लाख रुपयांचे बिल आले!' असे दाखलेही देत असत. त्या न आलेल्या संकटाच्या धाकाने जीव उतू आला होता. मात्र रविवार संध्याकाळपर्यंत तरी फोन आला नाही. नंतर त्यांचे कार्यालय बंद होत असेल, असा मी समज करून घेतला. तर 'असं काही नाही, काही जणांना अपरात्रीही फोन आलेले आहेत' असे सांगून सख्ख्या निकटवर्तियांनी माझी झोप उडवून लावली.

सोमवारी यथावकाश अहवाल हाती आले. डॉक्टरांच्या बोलावण्याची प्रतीक्षा होती. अधाशीपणे

'कोविड'चा अहवाल आधी उघडला. 'निगेटिव्ह' पाहून हायसे झाले. निरपराधित्वाचे प्रमाणपत्रच मिळाले जणू. त्या आनंदात क्षणभर का होईना, दुखऱ्या या दाताचाही विसरच पडला होता.

मग सारे आरोग्यचाचण्यांचे अहवाल हाती घेऊन 'विशेषज्ञां'समोर पेशी झाली. सारे अहवाल उत्तमच होते. असे वाटले की, आता दात काढायची अनुमती मिळणार! मग प्रत्यक्ष शारीरिक तपासाला सुरुवात झाली. रक्तदाब मोजला गेला. तो तर एवढ्या पातळीला पोहोचलेला होता की, शुश्रुषालयात भरती होण्यास पात्र व्हावे.

गेल्या जानेवारीपासून सुमारे वर्षभरात माझी दिनचर्याच बदललेली होती. गेल्या जानेवारीत मी नागपूरला माझ्या शाळेत व्याख्यान देण्याकरता गेलेलो होतो. ४६ वर्षांनी माझ्या शाळेला भेट दिली होती. मग लागोपाठ वेळणेश्वरलाही यशस्वीरीत्या भेट दिली होती अभियांत्रिकीच्या मुलांना उपकरणानं शिकवायला. सलग आठवड्याभराचा दीर्घ प्रवासांनी भरलेला कार्यसंपृक्त कार्यक्रम मी थंडी, दगदग, बदलते विविधरंगी कार्यक्रम भरलेले असूनही, लीलया पार पाडलेला होता. सांगायचे एवढेच की, मी तेव्हा कमालीचा स्वस्थ (फिट्ट) होतो. औषधाने का होईना रक्तदाब १००/७० राहत असे. रोज सुमारे १० किलोमीटर चालत असे. खूप अनुवाद करत असे आणि अनुसरलेली जीवनशैली कसोशीने पाळत असे.

नंतर करोनाचे पदार्पण झाले. कसे कोण जाणे पण दररोजचे चालणे अचानकच बंद झाले. फावला वेळ उरू लागला. वामकुक्षीत भर करू लागला. जेव्हा करायला काहीच नसते तेव्हा खाण्यापिण्याचे लाड बहरास येतात. मग तेही झाले. कशी कोण जाणे, पण हळूहळू आणि निश्चितपणे माझी स्वस्थता खचत खचतच गेली. दातदुखीने उच्छाद मांडला.

दर्द मिन्नतकश-ए-दवा न हुआ।
मै न अच्छा हुआ, बुरा न हुआ।।

म्हणजे -

दुःख औषधास मिंधे झाले नाही।
मी बरा झालो नाही, वाईट झाले नाही।।

अर्थ असा की, दातदुखी उपायांना दादच देत नव्हती. मी बरा होत नव्हतो, तेही एका अर्थाने वाईट झालेच नाही. चांगलेच झाले. कारण त्यामुळे माझ्या स्वस्थतेची अस्वस्थ अवस्था उघड झाली. रक्तदाबाची औषधे खूप वाढवली गेली. आठवड्याभराने रक्तदाब नियंत्रणात आला. दात काढायची रीतसर अनुमती मिळाली. अर्थात जी स्वस्थता दीर्घकालीन जीवनशैली-परिवर्तनांनी कष्टपूर्वक अर्जिली होती, ती पुन्हा औषधांच्या भडिमारात अडकलेली पाहून खूप दुःख झाले. त्यातून बाहेर येण्याचे उपाय ठाऊक होतेच. आता ते तातडीने अंमलात आणायचा निर्धार झाला. कालांतराने त्याचे परिणामही दिसू लागतील. त्याकरता निदान महिनाभर तरी सातत्य टिकवण्याचे आव्हान समोर होतेच. सध्या मात्र वाढत्या औषधांशी मैत्री करून दंतकथेचा अंत करण्याची वेळ येऊन ठेपली होती.

अक्कलदाढ असते एकदम खोलात. जबड्यात खोलवर, अखेरची जागा मिळालेली. ती काढायची तर अवजारे चालवायलाही खूप अपुरी जागा. शिवाय तोंडाच्या आत खोल जावे तसतसा वाढता अंधार, नेमकी जागाच अंधारी करून टाकत असतो. मात्र आधुनिक दंतशास्त्राच्या अद्वितीय आविष्कारांनी हे काम खूप सोपे झाले आहे. खोलवर पोहोचणारे प्रखर उजेड, अत्यंत सूक्ष्म पण कणखर प्रकाराची टणक शस्त्रास्त्रे, रुग्णाला वैद्यासमोर हव्या त्या अवस्थेत आडवा करण्याची अद्‌भूत सोय असलेली त्रिमिती-अवस्था-परिवर्तनशील खुर्ची, दातावर प्रखर दाब देऊन आणि त्यास तीव्र वारंवारितेची स्पंदने पुरवून हिरडीच्या मांसल कोंदणातून विलग

करण्याकरताचे स्वयंचलित स्पंदक, हे सारे अत्याचार त्या नाजूक हिरडीवर करतांना त्यात सर्वत्र विखुरलेल्या मज्जातंतूंनी मेंदूस या वाढत्या दुःखाचा सुगावाही लागू देऊ नये याकरता स्थानिक भूल देण्याकरताच्या विविध औषधी सूक्ष्म टोचणीने इष्ट स्थानी पावती करण्याची आयुधे हे सारे वैद्यकीय तंत्रज्ञानाने पुरवले आहे. अत्यंत खर्चिक तरीही आता उपलब्ध झालेल्या या सोयींचे आभार मानावेत तेवढे थोडेच. आता हे सारे असूनही प्रत्यक्षात दाढ तर दंतवैद्यालाच काढायची असते. वरील सामुग्री वापरण्याचे त्याचे कौशल्यच दुःख नियंत्रण करणार असते. दात काढायला लागणारा वेळ कमी जास्त करणार असते. दात काढल्यावर रक्तस्राव होणारच असतो. त्याला आवर घालावा लागणारच असतो. त्यावरही ती कौशल्येच ताबा मिळवणार असतात.

तेवढ्या खोलातील अंधारी जखम, रक्तलांछित हिरड्यांचा शोध घेत, अत्यंत सूक्ष्म सुई आणि कमालीचा सडपातळ, पण सशक्त दोरा वापरून शिवावी लागते. याबाबतीत मी अत्यंत सुदैवी होतो. माझ्या दंतवैद्यांनी अपवादात्मक कौशल्ये प्राप्त केलेली होती. गरजेचा वेध घेत नेमक्या जागी नेमक्या प्रमाणात भूल देण्याची; शस्त्रास्त्रे आणि स्वयंचलित स्पंदक वापरण्याची; जरूर पडताच अत्यंत कोमल हालचालींतून, प्रबळ दाब देता येण्याची; आधार सुटलेला दात अलगद उकरून काढण्याची; मागे राहिलेली जखम रक्तमुक्त करण्याची आणि सगळ्यात कहर म्हणजे घटनास्थळीच ती जखम शिवून टाकण्याची सर्वच कौशल्ये त्यांनी खूप वापरली. तासाभराचे जणू काय युद्धच सहजपणे खेळून, त्यांनी रुग्ण हातावेगळा केला होता. पुढचा रुग्ण हाती घेण्यास त्या सिद्ध होत्या. सावधचित्त, स्वस्थचित्त आणि दत्तचित्तही.

त्यांच्या स्वाध्यायाने सिद्ध केलेल्या अपवादात्मक कौशल्यांमुळे मी स्तिमित झालो आहे. आपला समाज ज्या अत्यंत अवघड प्रश्नांची उत्तरे शोधत असतो, त्यातील एका खूपच अवघड प्रश्नाचे त्या उत्तर आहेत! माझ्या साठा उत्तरांच्या दुःखास, पाचा उत्तरांत आवर घातल्याखातर मी त्यांचा ऋणी आहे!!

१९८५ साली दीड रुपयात चालत्या लोकलमध्ये दुखरा दात क्षणार्धात उपटून हातात देणारा सरदारजी कुठे आणि २०२१ साली दाताचे दुःख परवडेल अशी प्रतीक्षेची दुःखे गाठी बांधून, हजारो रुपयांनी खिसा खालसा करणारी अत्याधुनिक वैद्यकीय व्यवस्था कुठे! मात्र आधुनिकतेच्या शोधात हाती केवळ दुःखच आले की काय? असा जो समज, वरील लेखाने निर्माण होण्याची दाट शक्यता आहे, त्याला दुसरीही सुखकारक सोनेरी कडा आहे.

याच आधुनिकतेच्या शोधात मला वेदनारहित, रक्तपातविहीन दुःखमोचनाच्या अनमोल उपायांचा शोध लागला होता. जबड्याच्या खोल अंतरात अक्कलदाढ काढल्यावर उरलेल्या भळभळत्या जखमेस अपवादात्मक कौशल्याने सत्त्वर शिवता येते हे ज्ञान झालेले होते. माझ्या 'अर्वाचीन दंतकथे'ला अपेक्षित असलेला सुखान्त शेवट लाभला होता. शरीरात वर्धमान असलेल्या हृदयविकारादी प्रबळ शत्रुंच्या कटकारस्थानांचा सुगावाच काय, पण पक्का पुरावा हाती आलेला होता. ती लढाईही आता हाती घेता येणार होती. हे सारेच लाभ मला झाले आहेत. मात्र ते सारे लाभ हाती पाडून घेताना दुर्दैवाने गमावलेल्या 'अक्कलदाढेने' दिलेली ही 'अक्कल' आपणा सुहृदांस सादर करत असताना मला कृतकृत्यतेचे समाधान वाटत आहे!

**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी, टिळकपथ,
टिळकनगर, डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

# रेवडी संस्कृती

*रेवडी संस्कृती हा शब्द आधुनिक भारतीय राजकारणात सध्या बराच चर्चिला गेला आहे. या विषयाचा सविस्तर आढावा प्रस्तुत लेखात देत आहोत - संपादक*

अलीकडच्या काही दिवसांत, अनवधानाने का होईना, पण काही महत्त्वाचे मुद्दे आपल्या देशात राजकीय वातावरणात चर्चेत आले आहेत, येत आहेत. ती विधाने करणाऱ्या संबंधित व्यक्तींच्या तशा अपेक्षा नसतीलही; पण तरीही ते मुद्दे वेगवेगळ्या बाजूने चर्चिले जात आहेत हे नक्कीच !

असे बरेचसे मुद्दे निव्वळ राजकीय व्यक्तींनी सुरू केले इतकेच त्यात साम्य नाही. राजकीय वक्तव्यांनी चर्चा सुरू झाल्याने अशा विषयांची राजकीय चर्चा तर झालीच किंवा होते आहेच; पण त्याला आर्थिक - सामाजिक, काही प्रमाणात अगदी वैधानिक बाजूही आहेत हेही अशा मुद्यातले महत्त्वाचे साम्य आहे.

अशा मुद्यांची उदाहरणे घ्यायची झाली तर नवनिर्वाचित माननीय राष्ट्रपतींचा राष्ट्रपत्नी असा झालेला उल्लेख, महाराष्ट्रात ठाकरे सरकार कोसळून स्थापन झालेले माननीय एकनाथराव शिंदे आणि माननीय देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आणि त्याबाबत सुरू असलेली चर्चेची भन्नाट पातळी, महाराष्ट्रातील अर्थकारणाबाबत माननीय राज्यपाल महोदयांनी केलेले विधान आणि नंतरचे त्याचबाबत त्यांनीच जारी केलेले विवेचन आणि तुलनेने निकोप असे उदाहरण म्हणजे सर्व काही किंवा बरंच काही मोफत किंवा स्वस्त देण्याबाबत सुरू झालेली चर्चा!

यापैकी केंद्र आणि/ किंवा राज्य सरकारांनी जनतेला दिलेली विविध आश्वासने हा या लेखाचा विषय आहे. तसा हा विषय काही आजचा नाही. अगदी आपल्या देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यापासून सामाजिक न्याय या नावाने (नावाखाली म्हणण्याचे धाडस करत नाही.) या ना त्या स्वरूपात सवलती देणे सुरू आहे. वीज, पाणी, घरगुती गॅस, गृह-कर्ज, रेल्वे सेवा, टपाल-सेवा ही त्याबाबतची एकनिष्ठ क्षेत्रे ! अशा सवलतींचा उल्लेख अलीकडच्या काळात 'रेवडी संस्कृती' म्हणून केला जातो आहे.

अशा नामप्रदान परंपरेत मूळ रेवडी शब्दामागे 'ईश्वरी प्रसाद' अशी छटा आहे त्याचा मात्र अपमान होतो आहे याकडे मात्र सार्वत्रिक, सार्वकालिक, सर्वपक्षीय दुर्लक्ष होते आहे.

अर्थात अशा सवलती सुरू होताना त्याबाबत त्यावेळी सदूहेतू असतोच; पण काळाच्या ओघात त्याचे कालबाह्य सार्वत्रिकीकरण किंवा गैरवापर सुरू होतो. त्या गैरवापराला अलीकडे रेवडी संस्कृती हा शब्दप्रयोग केला जातो आहे. श्रद्धेने प्रसाद ओंजळीत घ्यावा आणि गर्दीत कोणाचा तरी अनवधानाने धक्का लागून तो प्रसाद ग्रहण न होता पायदळी तुडवला जावा असे काहीसे हे आहे.

किंवा नंतरच्या काळात तो पायदळीच तुडवला जाण्याचीच प्रथा सुरू व्हावी हा रेवडी संस्कृतीचा गाभा आहे.

पण रेवडी संस्कृती हा शब्द - प्रयोग रूढ करताना चणे - फुटाणे- बत्तासे - रेवडी ही महाराष्ट्राची सर्वसामान्य प्रसाद - संस्कृती आहे याकडे दुर्लक्ष होते आहे. असे दुर्लक्ष करणे हे 'रावडी' संस्कृतीचेही लक्षण आहे आणि रेवडी संस्कृतीचेही लक्षण आहेच आहे !

पाप ही अशी गोष्ट आहे जी लपवली की वाढत जाते!

याबाबत आवर्जून लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे या चर्चेच्या घोळत बाकीची कोणतीही क्षेत्रं आणली गेली तरी आपल्या देशातील कोणताही राजकीय पक्ष कधीही, अगदी कधीही आरक्षण हा मुद्दा चुकूनही त्यात आणत नाही.

याबाबत आवर्जून लक्षात घेण्याजोगी दुसरी गोष्ट म्हणजे, साधारणपणे देशांतर्गत महागाईचा दर वाढायला लागला की अशी चर्चा सुरू होते. किंवा जागतिक वित्तसंस्थानी आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या दराबद्दल काही नकारात्मक विधान केले की अशा चर्चा जरा जास्तच जोर धरतात. आणि याबाबतची तिसरी लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे, याबाबत जी चर्चा होते ती अनेकदा त्यातल्या कोणत्याही पैलूंबाबत सर्वंकष असण्यापेक्षा सोयीस्कर असते.

तसेच याबाबतची चौथी लक्षणीय गोष्ट म्हणजे सर्वसाधारणपणे काळ मागे - पुढे होत असेल, पण आधी रेवड्या वाटणारे आणि नंतर त्यालाच नावे वाटणारे बहुतेकवेळा एकच असतात.

याबाबतची पाचवी गंमतीची गोष्ट म्हणजे ज्या काही आहेत त्या रेवड्या 'त्या आधी प्रत्यक्षात मिळू तर देत' असाही एक मोठा वर्ग असतो. एकदा का त्यांचा लाभ त्यांच्या हातात पडला की मग एकदम सात्विक संताप आणि तात्विक चर्चा करत यांचा विरोध सुरू होतो. एकदम सौ-सौ चुहे खाकर बिल्ली चली हाजको च्या वरताण गत!

सुरवातीच्या काळात केंद्र आणि बहुतांश राज्ये यात एकाच पक्षाची, आणि तीही सलग, राजवट असल्याने केंद्रीय योजना या सरसकट पाकिटात अशा गोष्टी सरकवल्या गेल्या. पण नंतरच्या काळात झालेला आधी प्रादेशिक पक्षांचा उदय आणि नंतरच्या काळात सुरू झालेला आघाडी सरकारांचा जमाना यामुळे हा विषय आणखीच वाढला. कारण यांत राजकारण हे अर्थकारणावर सरळसरळ मात करायला लागले. तरीही जोपर्यंत असे विषय निवडणुकांच्या जाहीरनाम्यापुरेसे मर्यादीत राहत होते तोपर्यंत ते काही प्रमाणात तरी आवाक्यात होते. कारण निवडणूक जाहीरनामा ही बाब ना तो जाहीरनामा प्रसिद्ध करणारे संबंधित राजकीय पक्ष गांभीर्याने घेत होते; ना भारतीय नागरिक !

पण नंतरच्या काळात हा विषय वार्षिक अर्थसंकल्पाचा पाया बनू लागला. नंतर नंतर तर गृहोपयोगी वस्तूंबाबत तो निव्वळ राजकीय खेळीचा भाग बनू लागला. भाजपाला दिल्ली विधानसभा कांद्याचे भाव आवाक्यात आणण्यात अपयश आल्याने गमवावी लागली. अगदी सुषमा स्वराज यांच्यासारख्या महत्त्वपूर्ण नेत्या इरेला पडल्या होत्या तरी !! त्यातही १९४७ ते १९९० च्या काळात आपल्या देशात राजकीय लोकशाही असली तरी आर्थिक समीकरणे आणि ताळेबंद हे नियंत्रित अर्थव्यवस्थेची होती. त्यामुळे राष्ट्रीय अर्थकारणात खाजगी क्षेत्राचा वाटा असला तरी तेही लायसन्स - परमिट राजच्या चौकटीत होते. त्यामुळे अशा गोष्टींकडे खाजगी क्षेत्रही काहीवेळा अपरिहार्यता म्हणून, तर काही वेळा चाणाक्षपणे दुर्लक्ष करत होते. (हीही एक प्रकारची रेवडी संस्कृतीच !)

१९९१ पासूनच्या उदारीकरणाच्या धोरणाने पहिल्यांदा खऱ्या अर्थाने याबाबत चर्चेला सुरवात झाली. तशी १९८७ च्या अर्थसंकल्पात तत्कालीन अर्थमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी जाहीर केलेल्या तुलनात्मक दीर्घकालीन अर्थकारण चर्चेपासून याबाबत विचार सुरू झाला.

१९९१ साली सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमात याला पहिल्यांदा खरा चाप बसला. त्यात जितका आपल्या देशाला तेव्हा मदत करणाऱ्या जागतिक किंवा विदेशी वित्तसंस्थाचा दबाव कारणीभूत आहे; तेवढाच आणि तितकाच आपल्या तत्कालीन सरकारांनी दाखवलेल्या संयमाचाही वाटा आहे. १९९१ पासून आजपर्यंत राष्ट्रीय सरकार धोरणात फारसे बदल झालेले

नाहीत. या काळात प्राधान्यक्रमात बदल झाले असले किंवा तत्कालीन सरकारच्या राजकीय रंगसंगतीनुसार योजनांच्या नावात बदल झाले असले तरी धोरण म्हणून एक प्रकारचे सातत्य कायम आहे. त्यांच्या फायद्याने आर्थिक विकासाचा दर कमालीचा सुधारला. त्या काळात ही चर्चा आणि त्याबाबत थोडीफार कृती थंडावली. आणि तेंव्हापासून अशी चर्चा नकारात्मक वातावरणात होते हा काही निव्वळ योगायोग असत नाही. असणार नाही.

आज हा सगळा पुरातन इतिहास वाटला तरी काही वेळा इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याने त्याचा विचार करावा लागत असतोच. कारण हा विषय निव्वळ आर्थिक, निव्वळ राजकीय, निव्वळ सामाजिक असा कधीच नसतो. आजही हा विषय सुरू होण्याची अनेक कारणे आहेत. अगदी तात्कालिक कारण, जे राजकीय स्वरूपाचे आहे, ते म्हणजे एकीकडे खाजगीकरण – उदारीकरण – जागतिकीकरण या धोरणाची तीन दशके साजरी करत असताना त्यांना अनुस्यूत असणाऱ्या आर्थिक शिस्तीला धाब्यावर बसवत घोषणा करत दोन राज्यांच्या विधानसभा लागोपाठ एका पक्षाने जिंकल्या. केंद्रात सत्तेत नसणाऱ्या या पक्षाने या दोन विधानसभा केवळ जिंकल्या असे नाही, तर अक्षरशः तीन चतुर्थांशहून जास्त जागा जिंकत ताब्यात घेतल्या. हे म्हणजे जगन्नाथाचा राजकीय रथ किंवा अश्वमेध यज्ञाचा घोडा अडवण्यासारखे झाले. त्यामुळे योग्य वेळ साधत त्यावर राजकीय हल्ला चढवत आपल्या देशाच्या महत्त्वपूर्ण नेत्याने त्याची रेवडी संस्कृती अशा शब्दांत खिल्ली उडवली. आणि ते योग्यही आहे.

एकीकडे नीतिन गडकरींसारखा अतिशय कार्यक्षम मंत्री चांगले रस्ते हवे असतील तर टोल द्यावा लागेल अशी रोखठोक भूमिका घेतो आणि दुसरीकडे अशी आव–जाव भूमिका घेतली गेली तर आर्थिक समीकरणांची जुळवाजुळव कशी करत राहायची ?

बरं, एकीकडे कबूल केलेल्या वेळेवर, प्रसंगी वेळेच्या आधी सामाजिक उत्तरदायित्त्वाचे प्रकल्प पुरे होत असताना हे सुरू ठेवणे समंजसपणाचे ठरत नाही. म्हणून आज ही चर्चा जास्त जोर धरते. याबाबत इतरही पक्ष तटस्थ भूमिका घेतात. ना रेवडी संस्कृतीच्या समर्थनार्थ जाहीर सातत्यपूर्ण कृती; ना त्याच्या विरोधात अशी भूमिका !

अशा रेवडी संस्कृतीच्या प्रभावाचा केवळ तात्कालिक अर्थकारणावरच प्रभाव पडतो असे नाही तर त्याचे दूरगामी परिणाम होत असतात. अशा रेवडी संस्कृतीमुळे गुंतवणुकीचा ओघ कमालीचा आणि कायमचा दुखावला जातो. कारण अशा रेवडी संस्कृतीत व्यावसायिक मालाची व्यावसायिक किंमत मिळणे कठीण होत जाते. त्यातून देशांतर्गत आणि विदेशी गुंतवणुकीचा ओघ थंडावत राहतो. आजमितीस श्रीलंका, पाकिस्तान, काही प्रमाणात बांगलादेश आणि ब्रम्हदेश (म्यानमार) या आपल्या शेजारी राष्ट्रांच्या सध्याच्या स्थितीची ही कारणमीमांसा आहे. आणि दुर्दैवाने ही यादी इतक्याच देशांपुरेशी मर्यादीत नाही.

अगदी आपल्या देशातले आणि तेही १९७० च्या दशकातले एक वेगळे उदाहरण इथे आवर्जून लक्षात घेण्याजोगे आहे. आपल्या देशात अत्यावश्यक वस्तू कायदा (Essential Commodities - ct) अतिशय चांगल्या उद्देशाने आणला गेला. या कायद्याच्या कार्यकक्षेत औषधेही येतात. १९७० च्या दशकात काही औषध कंपन्यांवर आर्थिक नुकसानीच्या ओझ्याखाली आपापले कारभार बंद करण्याची वेळ आली. कारण त्यांची बहुतांश औषध उत्पादने या कायद्याच्या कार्यकक्षेत आल्याने त्यांचा उत्पादन – खर्च काहीही आणि कितीही असला तरी त्यांना त्यांची उत्पादने सरकारने निर्धारित केलेल्या किंमतीने विकावी लागत असत आणि सरकारने निर्धारित केलेली विक्रीची किंमत ही अनेकदा उत्पादन

– खर्चापेक्षा कितीतरी कमी असे. असे फार काळ सुरू राहिल्यास उत्पादन – वितरण – संशोधन या सगळ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. आधी विलंब आणि मग बंद हा त्याचाच अंतिम परिणाम असतो. गुजरात मधली अम्बालाल साराभाई (ASE) हे त्याचे चांगले उदाहरण ठरेल. अगदी अलीकडच्या काळात कोरोना लसीबाबत अशीच काहीशी चर्चा झाली का ?

गंमत म्हणजे रेवडी संस्कृती म्हणून विरोध करणाऱ्या मंडळींच्या सरकार मधलेच सहकारी त्याच काळात अशा संस्कृती बाबत कारवाई करताना मात्र अंशतः कारवाई करतात. मग यालाही रेवडी संस्कृती म्हणायचं का ?

हेच पाहा ना ! माननीय श्री. अश्विनी वैष्णव हे एरवी अत्यंत कार्यक्षम मंत्री आहेत. पण त्यांनी अलीकडेच घोषणा केली आहे की, ज्येष्ठ नागरिकांना रेल्वे प्रवासाच्या भाड्यात मिळणारी सवलत काढून घेण्याचा सरकार विचार करत आहे. यामागे त्यांचे असणारे तर्कशास्त्र जर सुसंगत असेल, तर खासदारांना मिळणारी रेल्वे सवलत कशी काय सुरू राहते ? अर्थात हे काही एकमेव उदाहरण नाही.

सरकारी नोकरांना राष्ट्रीय पेन्शन व्यवस्था (NPS) जर जिद्दीने लागू केली जाऊ शकते, तर तोच नियम खासदार – आमदारांना मिळणाऱ्या पेन्शनला का लागू पडत नाही ? हा विरोधाभास तर गेले १७–१८ वर्षे सुरू आहे. म्हणजे आपल्याला मिळत असते ते यथायोग्य आणि दुसऱ्याला मिळाले तर ती रेवडी संस्कृती असे असते का ?

याला असणारी आर्थिक – सामाजिक पार्श्वभूमीही लक्षात घेण्याजोगी आहे. या दोन्ही अंगात असणारा समान धागा म्हणजे कोरोनानंतरची परिस्थिती. ..

एकीकडे दोन – अडीच वर्षांच्या कोरोना कालखंडात अनेकांची वैयक्तिक आयुष्याची घडी विस्कटून गेली आहे. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे सगळ्यांच्या मनात एकप्रकारची सार्वत्रिक आणि सार्वकालिक भीती बसली आहे. त्यामुळे जे जे स्वस्त किंवा मोफत मिळेल ते, तेंव्हा आणि तसे घेण्याच्या, अगदी साठवण्याच्या मनःस्थितीत आहे. भौगोलिक – आर्थिक – सामाजिक – कौटुंबिक – स्थानिक अशा सगळ्या सीमा – परिसीमा पार ओलांडणारी अशी ही सामाजिक परिस्थिती आहे.

अशी सामाजिक संवेदनशीलता कितीही समजण्याजोगी असली तरी आधी आर्थिक आणि म्हणून नंतर स्थानिक – राष्ट्रीय – जागतिक पातळीवर राजकीय अंगाने जराही परवडणारी नसते. हे जितके अल्पकालीन घटक म्हणून खरं आहे; तितकेच ते मध्यम ते दीर्घकालीन म्हणूनही खरे आहे.

कारण जेंव्हा एखादी वस्तू किंवा सेवा अत्यल्प दरात मिळू लागते किंवा मिळत राहते तेंव्हा त्याच्या मागणीत अचानक वाढ होते तेंव्हा तशी उत्पादनात वाढ आणि तीही लगेचच करणे संबंधित उद्योजक, अगदी तो उद्योजक सरकारी मालकीची किंवा सरकारी नियंत्रणातली असली तरी, शक्य होत नाही. त्यांतून फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि राजकीय असंतोष उसळतो. हा अनुभव आपण सगळ्यांनी अगदी अलीकडेच घेतला आहे. त्यात आता कोरोनामुळे किंवा कोरोना नंतर जन्माला आलेल्या आंतरराष्ट्रीय घटकांमुळे आणखीनच भर पडली आहे.

आणि म्हणून आता ही मोफत संस्कृती किंवा रेवडी संस्कृती हा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

**– चन्द्रशेखर टिळक**
सी–४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६
chandrashekhartilakgmail.com

●●●

# डब्ल्यू बी येट्स व जॉन किट्सची कविता

*डब्ल्यू बी येट्स व जॉन किट्स या दोन प्रख्यात इंग्रजी कवींच्या काव्यप्रतिभा ह्या बद्दल डॉ. आनंद कुलकर्णी यांनी लिहिलेला विशेष लेख – संपादक*

हे W. B. Yeats नावाचं अजून एक भूत माझ्या मनात कायम वसतीला असतं. सगळ्या धबडग्यात त्याची कविता मनाच्या कोपऱ्यात निपचित पडून असते. मला मोकळा वेळ असला आणि मन शांत असलं की येट्स आणि त्याची कविता पुन्हा डोकं वर काढतात. Keats बरोबर Yeats नी माझी कायम अडचण केली. सतत जखडून ठेवलं. किट्सने मला का जखडून ठेवलं? प्रतिभा अल्पायुषी असली तरी किती मोहक असू शकते हे किट्सने दाखवलं म्हणून. आणि येट्सने का जखडून ठेवलं? प्रतिभा बहरली तर ती किती विलोभनीय आणि खोल असू शकते हे येटसनं दाखवलं म्हणून. हे दोघंही असं लिहितात की, आपण काठावर बसून वाचूच शकत नाही. शब्दांचा नुसता झिम्मा चालू असतो. खेचले जातोच आपण कवितेत. मग काय, एकदा कवितेत उतरलो आपण, की अनुभवांचे रंगीबेरंगी ताटवे नजरेला पडतात. तसं बघायला गेलं तर किट्स आणि येट्स च्या कवितेत सारखेपणा नाही. येट्स काही किट्सचा वारस नाही. त्याच्यावर पगडा होता तो ब्लेक (Blake) आणि शेलीचा (Shelley). नाही म्हणायला त्याला किट्सच्या कविता आवडायच्या. त्या आवडायच्या कारण किट्सच्या कवितेने त्याला भौतिक गोष्टीतील सौंदर्य दाखवलं आणि त्याला ते आवडलं. ब्लेकच्या कवितेत कमालीची दुर्बोधता आहे आणि ती त्याच्या गूढ, अभौतिक दृष्टीतून आलेली आहे. तीही येट्सला आवडली होती पण त्याला तश्शीच दुर्बोधता त्याच्या कवितेत नको होती. येट्सकडे गूढता आणि आदर्शवाद ब्लेककडूनच आलेला आहे. असं असूनही येट्सने ब्लेकच्या गूढतेला वास्तव जगातील अनुभवांशी जोडलं होतं. वेगळ्या शब्दांत सांगायचं तर, येट्सने भौतिक सौंदर्य आणि गूढ अनुभूतीचा संगम साधला होता. या दोन्हींचं तरल आणि उत्कट रूप म्हणजे त्याच्या कवितेत येणारी प्रतिकं. त्याच्या कवितेत प्रतिकं महत्त्वाची ठरतात ती यासाठी. ब्लेकच्या या ओळी बघा :





A happy blossom,
Sees you, swift as arrow,
Seek your cradle as narrow
Near my bosom

या ओळींमध्ये खूप गूढता आहे. गडद धुक्याचे विस्तीर्ण प्रदेश जणू! शेवटपर्यंत कळत नाही. हा बोगद्यातून केलेला प्रवास असतो. अर्थाची तिरीप कुठूनच येतं नाही. असा बोगदा ज्याला शेवटच नाही, प्रकाश असलेली मोकळी जागा कधीच येत नाही.

आता येट्सच्या पुढील ओळी बघा :

O body swayed to music, O brightening glance,
How can we know the dancer from the dance?

यात भौतिक सौंदर्य आणि गूढतेचा केवढा मोहक संगम आहे. "body swayed to music" यात सौंदर्य, तरलता, भौतिकता, गूढता सगळं कसं प्रमाणात आहे आणि तरीही प्रभावी आहे. शरीर सुरेखपणे डोलत-डोलत संगीताचं रूप घेतं. जणू शरीराचा अशरीरी संगीताकडे झालेला सूरमयी प्रवास, नर्तकच नृत्य होण्याचा लयबद्ध कायापालट! हे असं स्वत:चं रूप सापडणं म्हणजे किती समग्रपणे आलेला सुंदर अनुभव असतो. तो येट्सच्या कवितेत सतत येत राहतो.

स्वत:चा शोध ही येट्सच्या कवितेची प्रेरणा होती. कधी असा शोध त्याने ब्लेकच्या गूढतेत घेतला, कधी आयरीश परंपरा आणि अस्मितेत घेतला, कधी मॉड गॉनमधे (त्याची न झालेली प्रेयसी), तर कधी वृद्धत्वात घेतला. जीवनाचं कोणतंच अंग त्याने नाकारलं नाही पण स्वीकारताना 'आपलं यात काय होतंय?' याचा तो सतत शोध घेत राहिला. अशा शोधाला व्यक्त करायला त्याच्याकडे कवितेसारखं माध्यम होतं. त्याने या माध्यमाचा उपयोग केलाच, पण पुढे चालून या माध्यमाला-कवितेला आपलं जीवितकार्य मानलं. "...out of the quarrel with ourselves we make poetry"- आपुलाची वाद आपणाशी असं त्याचं मत होतं.

येट्सचा The Tower हा १९२८ ला प्रकाशित झालेला कविता संग्रह सर्वोत्तम समजला जातो; पण मला त्याच्या सगळ्या कविता आवडतात. त्याची 'Sailing to Byzantium' ही कविता याच संग्रहातली. यात वृद्धत्वाची चर्चा आहे, तशी तारुण्य कशाला म्हणायचं याचीही चर्चा आहे. कवीला अशा जगात जायचंय जिथं वृद्धत्व अडगळ ठरू नये आणि तारुण्य नवनिर्मिती ठरावी. तारुण्यात भौतिक सुखाची लालसा असते, पण ती तारुण्याला चिरंतन करत नाही. उलट ती तारुण्य संपवते. त्यासाठी म्हातारी न होणारी बुद्धी हवी, नवनिर्माणाची क्षमता हवी. आपलं मन शरीररूपी जनावरच्या दावणीला बांधलेलं असतं. शरीररूपी जनावर मरणाच्या दारी गेलं तरी वासना सुटणार नाही. यामुळे कवीला वासनामुक्त जीवन हवं आहे. ते मिळण्याचं ठिकाण म्हणजे Byzantium. आणि असं वासनामुक्त जीवन तिथल्या कलावंताकडून-कारागीरांकडून मिळेल असा कवीला विश्वास आहे. शेवटी काय कलाच जीवनाला अर्थ मिळवून देते आणि अमरत्वही मिळवून देते.

मला ही कविता तिच्या शीर्षकापासूनच मूड पकडताना दिसते. शीर्षकातील पहिला शब्द 'Sailing' असा आहे. तो नव्या जगात जाण्याची प्रक्रिया सूचवतो. जाणं संपलेलं नाही, प्रवास संपलेला नाही. तो चालू आहे, अखंडपणे चालू राहील. असा आत्मशोधाचा प्रवास कधी संपतो का? प्रत्येकाला तो करावा वाटतो आणि तो कधीच पूर्ण होत नसतो. तारुण्यात हा प्रवास नको असतो, कारण मनाला खिळवून ठेवणारे कितीतरी भौतिक सुख भोवती असतात. असा विचार आयुष्याच्या संध्याकाळी येतो. मग वेगळ्या, नव्या जगाची आस लागते. या अवस्थेत सगळ्या भौतिक इच्छा संपाव्यात आणि निरामय असं शाश्वत आयुष्य मिळावं असं कोणाला वाटत नाही? पण ते वाटणं असतं म्हणूनच असा प्रवास मानसिक अधिक असतो, शारीरिक नसतो. तो अनुभवाच्या पातळीवर उतरणं जवळपास अशक्य असतं. अशा वेळी कवीकडे कविता असते म्हणजे कला असते आणि तिच्यामार्फत तो असा प्रवास करतो.

येट्सकडे गुंतागूंतीच्या आशयाला शब्दात गुंफण्याची अफाट क्षमता आहे. मला त्याची शब्दशक्ती, अनवट प्रतीक आणि प्रतिमांची मांडणी चकित करून सोडते. कवी म्हणून त्याच्याइतकी समृद्धी क्वचितच कोणाकडे असेल. त्याच्या काही ओळी आशयाचा सोलीव गाभा तीव्र तरलतेने आणि नजाकतीने व्यक्त करतात. उदाहरण म्हणून ही ओळ बघता येईल : Monuments of

(पृष्ठ क्र. १५ वर)

# समीक्षा - डीएनए चा आक्रोश

*रंजन गर्गे ह्यांच्या 'डीएनए चा आक्रोश' ह्या नांवातच कथांचे स्वरूप लक्षात येते. या कथा संग्रहात एकूण ११ कथा समाविष्ट आहेत. पुस्तकाला प्रसिद्ध विज्ञान लेखक श्री. अ. पां. देशपांडे यांची अनुरूप अशी प्रस्तावना लाभलेली आहे. यात जैवतंत्रज्ञान या विज्ञान क्षेत्रातील वैज्ञानिक मूळ संकल्पना व त्यावर काल्पनिकतेचे आवरण कथेच्या माध्यमातून मांडले आहे. - संपादक*

मराठी साहित्यातील 'कथा' हा प्राचीन व रोचक काव्यप्रकार आहे. संस्कृत वाङ्मयातही विष्णुशर्म्याने सांगितलेल्या कथा म्हणजेच पंचतंत्र, बृहत्कथासरित्सागर इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

उद्बोधन व आनंद हे दोन्ही काव्याचे निकष लेखक मूळ कथाबीजावर कल्पनेने शब्दांकित करतो व ते साध्य करतो.




मूळात लेखकाचा पिंड हा विज्ञानाचा... सूक्ष्म-जीवशास्त्राच्या प्राध्यापकाचा... सूक्ष्मजीवशास्त्रातील सूक्ष्म जीवाचे प्रकार शास्त्रीय व आत्मकथात्मक शैलीत पहिल्या कथेत मांडले आहेत. सामान्य वाचकाला त्यांची यथार्थ माहिती होते. मानवी अवयवरोपण ही कल्पना यशस्वीपणे विज्ञानाने आज राबवलीय; पण जिची मूळे आपल्या पुराणकथेत आहेत, जसे गजवदन इ. प्राण्यांची तोंडे व मानवी शरीर ही कल्पना सत्यात उतरली तर काय होईल? हे 'हयवदन' या कथेत ऋत्विक ह्या नायकाच्या वर्णनाने मांडलीय. नाळ ही कथा 'क्लोनिंग' या तंत्रावर आधारलेली आहे. यामध्ये मानवासारखेच व त्याच वयाचे क्लोन झाले तर त्यात विधायकता किती? हा विचारही अंतर्मुख करणारा आहे. तो कितपत श्रेयस्कर होईल? 'विज्ञान-विधायक की विध्वंसक?' ही जाणीवही लेखकाला आहे. मूल्यात्मक जीवनाची जोड असेल तर मानवी जीवन श्रेयस्कर होईल हा विचार त्यात आहे. 'बीजांकुर' ह्या कथेत वैज्ञानिकता व भावनिकता ह्यांचे संमिश्रण आहे.

मूळात लेखकाची भ्रमणाची आवड व अनुभव ह्यांचाही प्रत्यय अनेक वेळा येतो. नेपाळमधील पोखरा व्हॅली व तेथील भौगोलिक सविस्तर वर्णन त्याची साक्ष देते. 'कॅन्यन' कथेत नायक डॉ. विल्यम स्वतःचा पाय अनन्याला कापायला सांगून, सुटका करण्यास सांगतोय. खरंच अंगावर काटा येतो. त्यातील रोमहर्षक वर्णन उल्लेखनीय आहे. सहवासातून निर्माण झालेल्या प्रेमाचे संयमित वर्णनही त्यात आहे. सहज सुंदरता त्यात आहे. कथेला साहित्यिक रूप देतांना लेखकाचे शब्दप्रभुत्व जाणवते.

(पृष्ठ क्र. २५ वर)

# एक अविस्मरणीय सहभाग

*१८वी स्काऊट गाईड नॅशनल जांबोरी, रोहट, पाली, राजस्थान येथे पार पडली. ठाण्यातील डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा या शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यादरम्यान आलेले अनुभव. - संपादक*

दि. ४ जानेवारी ते १० जानेवारी २०२३ नुकत्याच पार पडलेल्या स्काऊट-गाईड नॅशनल जांबोरी, राजस्थान, पाली व राष्ट्रीय कार्यालय दिल्ली यांच्यावतीने आयोजन करण्यात आले होते. राजस्थान सरकारने २५ करोड खर्च करून पुढील सुविधा दिलेल्या होते. ३५०० राहण्यासाठी तंबू, ५० बेडचे हॉस्पिटल, ०२ हेलीपेड, १७०० टॉयलेट, १२०० बाथरूम इ. सुविधा उपलब्ध करून दिलेली होती. स्काऊट, गाईड संख्या ३५००० पेक्षा जास्त होती. संपूर्ण देशातून परदेशातून स्काऊट-गाईड येथे आले होते. मालदीप, मलेशिया, बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ, सौदी अरेबिया या देशांतील २९८ स्काऊट-गाईड सहभागी झाले.

महाराष्ट्रातून ९८१ स्काऊट, ८९१ गाईड सहभागी झाले. या जांबोरीची ब्रीद वाक्य शांती के साथ प्रगती होते. या सोहळ्याचे उद्घाटन आपल्या देशाच्या राष्ट्रपती सन्माननीय श्रीमती द्रौपदी मुर्मूजी उपस्थित होत्या. त्यांच्यासमोर ४५०० स्काऊट-गाईडने एकत्रित नृत्य सादर केले. त्यांची नोंद वर्ल्ड रेकॉडमध्ये करण्यात आली.

'सूर्यकिरण' वायुसेनाच्या जवानांची नेत्रदीपक असे चित्तथरारक असे प्रात्यक्षिके अगदी जवळून बघितली. विलोभनीय नृत्य, चित्तथरारक विमानाचे प्रात्यक्षिक आणि राष्ट्रपतींचे स्फूर्तिदायक भाषण यांच्या त्रिवेणी संगमातून १८वी नॅशनल जांबोरीचे उद्घाटन झाले. यात अभिमानाची बाब म्हणजे सलामी कलर पार्टीत ठाण्यातील ३ गाईड सहभागी होत्या. नृत्यात १०३ स्का. गा. समावेश होता त्याची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली.

दि. जानेवारी ते १० जानेवारी पर्यंत दररोज सकाळी ५.३० ते रात्री १० वाजेपर्यंत अनेक कार्यक्रम घेण्यात आले. जसे दररोज सकाळी B.P. Six ध्वजारोहण, तंबू सजावट, पायोनियर प्रोजेक्ट, ॲडव्हेन्चर गेम्स, फन गेम, स्किलोरामा, ग्लोबल, डेव्हलपमेंट, फुड प्लाझा, शोभा यात्रा, योगासने, नाईट, हाईक, कॅम्प फायर, रांगोळी, शारीरिक प्रात्यक्षिके, लोकनृत्य, राज्यप्रदर्शनी, वरील सर्व कार्यक्रमात आमच्या स्काऊट गाईडने सहभाग घेतला व महाराष्ट्राचे नेतृत्व केले. त्यात महाराष्ट्राला ए व बी ग्रेड मिळाली. या कार्यक्रमाचा समारोप केंद्रीय मंत्री श्री अनुराग ठाकूर यांच्या उपस्थितीत पार पडला. या विलोभनीय अविस्मरणीय जांबोरीत ठाण्यातील एकमेव मराठी माध्यमाची शाळा सहभागी झाली होती. ९ स्काऊट व ९ गाईड. शिक्षक श्री. जीवन जाधव, शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर ह्या विद्यार्थ्यांसोबत होत्या. सर्वांना ॲडव्हेन्चर सांस्कृतिक कार्यक्रम व सहभागाचे प्रमाणपत्र व मेडल्स देण्यात आले. सर्वांकडून सर्वांचे खूप कौतुक होत आहे. यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर शाळेचे मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांचे सहकार्य लाभले.

**- सौ. कल्पना बोरवणकर**
गाईड कॅप्टन

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# गोदावरी - कथेपलीकडचा सिनेमा

*'गोदावरी' या नुकताच प्रदर्शित झालेल्या चित्रपटाबद्दल सुहास किर्लोस्कर यांनी लिहिलेले परीक्षण- संपादक*

गोदावरीची कथा म्हणजे अश्रद्ध माणसाचा श्रद्धेपर्यंतचा प्रवास आहे. पण कथा काय आहे यापेक्षा ती कथा कशी सादर केली आहे, हे महत्त्वाचे आहे. पुढे काय होणार, आता पुढे काय होणार, अशी अपेक्षा एखाद्या कथेकडून असते, कादंबरीकडून असू शकते. पण चित्रपट हे दृश्य माध्यम आहे. दिग्दर्शकाने दृश्यात्मकतेचा मानवी स्वभाव दर्शन घडवून आणण्यासाठी कसा वापर केला आहे, हे गोदावरी चित्रपटात बघावे.




नायक (जितेंद्र जोशी) आपल्या खोलीत बसला आहे ते दृश्य, त्याला त्या खिडकीतून काय दिसते, त्याची खोली बाहेरून कशी दिसते, तो जिथे बघतो आहे तिथे पुढे काय होणार आहे, तो जिथे उभा आहे तिथून कॅमेरा सुरू होतो आणि कॅमेरा लांब जातो आणि आपल्याला एका विषयाची व्याप्ती समजते... कोणत्याही संवादाशिवाय. शब्दबंबाळ चित्रपटांनी आपल्याला चुकीची सवय लावली आहे त्यामुळे त्या सवयीमधून बाहेर पडलो तर अशा दृश्य माध्यमातील प्रत्येक प्रसंगाचे अर्थ समजू लागतात. गोदावरीची हीच तर खरी खासियत आहे.

एखादा माणूस अश्रद्ध आहे हे कथेत लिहायचे असेल तर एक-दोन प्रसंग लिहावे लागतील. कादंबरीत कदाचित एक प्रकरण त्यावरच लिहावे लागेल. नाटकात दोन - तीन पात्रे एकमेकांशी तसे संवाद बोलतील. गोदावरी चित्रपटाच्या सुरुवातीला गोदावरी नदीच्या काठी बसलेला नायक नदीत सोडलेल्या दिव्यांपैकी एक दिवा पकडतो आणि त्यावर सिगारेट शिलगावतो. विषय दाखवला, विषय संपला.

नायक जितेंद्र जोशीच्या मनात काय सुरू आहे, हे अनेक प्रसंगात आपल्याला कोणत्याही संवादाशिवाय समजते. याचे श्रेय जाते दिग्दर्शक निखिल महाजन आणि सिनेमॅटोग्राफर शमीन कुलकर्णी यांना. प्राजक्त देशमुख आणि निखिल महाजन यांची पटकथा उत्तम आहे पण खरी कमाल आहे ती कमीत कमी संवादामधून चित्रपट दाखवण्याची. या चित्रपटात जे सांगायचे आहे ते असंख्य पात्रांच्या बडबडीमधून सांगता आलेच नसते, आले असते तर तो भावार्थ पोहोचला नसता. हृषिकेश पेटवे यांचे संकलन अप्रतिम. जितेंद्र जोशी एका प्रसंगात नदीमधून ओल्या पायाने घरात येतो, त्यावेळी त्या पायावर क्लोज-अप, त्यानंतर एकातएक गुंतवलेले शॉट्स आपल्याला दिसतात ते अप्रतिम टीमवर्क आहे. (कला दिग्दर्शक - मानसी जाधव) असा हा चित्रपट प्रत्येक शॉट मधून बोलतो म्हणूनच ती भाषा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात परदेशात समजली आणि त्याचे कौतुक झाले.

---

प्रसिद्धी ही अशी बाब आहे, जी कितीही मिळाली तरी, माणसाची तहान भागत नाही.

नायक (जितेंद्र जोशी) नदीच्या अस्वच्छतेबद्दल जे प्रश्न उपस्थित करतो, ते बरोबरच आहेत, फक्त परंपरेचा बुरखा घातल्यामुळे आपल्याला ते प्रश्न दिसत नाहीत किंवा त्या प्रश्नांकडे बघून न बघितल्यासारखे करण्यात आपण इतिकर्तव्यता मानतो. परंपरा म्हणजे काय? पूर्वापार चालत आलेली पद्धत सारासार विचार गुंडाळून ठेवून परंपरेच्या नावाखाली निर्बुद्धपणे सुरूच ठेवणे? परंपरा म्हणजे काय? नदी-किनारी प्रेत जाळणे आणि त्याच नदीत अस्थी विसर्जन करणे? परंपरा म्हणजे काय? त्याच नदीत डुबकी मारणे? परंपरा म्हणजे काय? निर्माल्य नदीत भिरकावून देणे? कालांतराने 'आपलेच मरण पाहिले म्यां डोळां' असे झाल्यावर सगळेच संदर्भ बदलतात, कारण चालणारी मती कुंठित होते. हा बदल दर्शवताना जितेंद्र जोशी ज्या पद्धतीने अभिनय केला आहे, तो लाजवाब आहे. या अनुषंगाने संजय मोने यांच्याबरोबरचा जितेंद्रचा संवाद उत्तम लिहिलाय आणि वठवला आहे. ते दोघे एका दरवाजातून बाहेर पडतात त्यावेळचा प्रसंग संवादाशिवाय पण अर्थपूर्ण.

जितेंद्र जोशीचा बोलका मूक अभिनय कमाल आहे. तो ज्याप्रकारे प्रत्येक प्रसंगात आपल्या भावना संयतपणे दाखवतो, त्याच्या मनात काय चालले आहे हे डोळ्यांनी सांगतो, ते दाद देण्यासारखे आहे. गौरी नलावडेने साकारलेली गौतमी अप्रतिम, विशेषतः ती नीना कुलकर्णीचा फोन पायरीवर बसून घेते, तो प्रसंग! वाह, क्या कहने. संजय मोने यांना संवाद एकाच दृश्यात आहे. ते शबनम गळ्यात मारून लायब्ररीत काम करायला जातात, लायब्ररीत बसतात, घरी येतात ही दृश्ये त्यांनी खास अभिनयाने साकारली आहेत. या चित्रपटात प्रियदर्शन जाधव यांना त्यांच्या वकुबाची भूमिका मिळाली आणि त्यांनी भूमिकेचे सोने केले. नीना कुलकर्णी आणि जितेंद्र जोशी या दोघांचा नावेत बसल्याचा प्रसंग भावपूर्ण आहे, तरीही संयत आहे. मोहित टाकळकरांनी साकारलेला फुगेवाला हलवून सोडतो.

चित्रपटाचे पार्श्वसंगीत अप्रतिम आहे. ते संगीत प्रत्येक प्रसंगाचा भाग बनले आहे त्यामुळे त्यात कोणती वाद्ये वाजली आहेत यापेक्षा प्रसंगाचा मूड कसा प्रभावीपणे पकडला आहे, हे महत्त्वाचे आहे. जितेंद्र जोशीच्या गीतांना ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी संगीतबद्ध केले आहे. गीते उत्तम लिहिली आहेत पण त्याचे शब्द तितक्या प्रभावीपणे गाण्यांमधून समोर येत नाहीत, असे मला प्रथमदर्शनी वाटले.

काही प्रसंगांमधील 'कॅमेऱ्याची भाषा' समजण्यासाठी पुन्हा एकदा बघायला हवा, कारण अजाणतेपणी आपण गोष्ट शोधत बसतो, ती सवय घालवायला हवी.

**– सुहास किर्लोस्कर**
९४२२५१४९१०

●●●

---

(पृष्ठ क्र. ११ वरून – **डब्ल्यू बी येट्स व जॉन किट्सची कविता**)

unageing intellect असा व्यापक आशय आणि अशी शब्दकळा लाभणं म्हणजेच सर्जनशीलता असते.

सगळे महान कवी कवितेशी आयुष्यभर इमान राखतात, स्वत:साठी आणि इतरांसाठी आनंदाची बाग फुलवतात, सुख-दुःखाची मीमांसा करतात, आपल्याला आपला शोध घ्यायला लावतात, मूल्यं आणि परंपरांची फेरमांडणी करतात, आर्जव करतात तशी मंगल कामना करतात. येट्स आधुनिक काळातला एक श्रेष्ठ कवी. त्यामुळे तो ही त्याच्या कवितेत हे सगळं करतो.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१०५०४

●●●

# गीतार्थे विश्वभरू, मांडू आनंदाचे आवरूं !

*नुकतीच गीता जयंती साजरी झाली. गीतेवरील ज्ञानेश्वरांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी ही टीका प्रसिद्ध आहे. एकूणच गीतेच्या भावविश्वावर प्रकाश टाकणारा प्रस्तुत लेख - संपादक*

ज्ञानदेवांना आपण माउली म्हणत असलो तरी त्यांनी ज्ञानेश्वरी वयाच्या अवघ्या पंधरा-सोळाव्या वयात लिहिली आहे ! या वयातली त्यांची शास्त्रार्थ सांगण्याची, गीतेतील तत्त्वज्ञानाला गवसणी घालण्याची सहजता पाहून भले भले विद्वान थक्क होतात. ज्ञानेश्वरीतली उपमा अलंकारांची ठायी ठायी असलेली पखरण ही त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता, सौंदर्यदृष्टी, निरीक्षणशक्ती याची दर्शक आहेत - पण वयसुलभ अशी मिस्कील वा निरागस अशी टिप्पणीही अनेक ठिकाणी आहे. अशा उपमा पाहिल्या की त्यांचं मोठेपण विसरावं नि माय होऊन त्या खट्याळ लोभस लेकराला कवेत घेऊन कौतुक करावं असं वाटतं!



वेद म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचे निःश्वास अशी मान्यता आहे. पण वेद काही एकसुरी- रुक्ष नाहीत तर चांगले रसमय, नादमय आहेत. नि:श्वासांना नाद केव्हा येतो? जागतेपणी आपण श्वास घेतो याची जाणीव आपल्यालाही होत नाही- पण निजलेल्या मनुष्याचा श्वास कसा सुरात लागतो ! तसे परमेश्वराला निद्रेत असताना जे स्फुरले किंवा दिसले आणि जे त्याच्या नादमय प्रश्वासातून इतरांना ऐकू आले ते वेद ! ज्ञानदेव म्हणतात, 'निद्रेत असताना ईश्वराने आपल्या घोरण्यातून वेद सांगितले.' पण सामान्य जनांना ते इतके सहज कसे आकळणार ? म्हणून मग जागेपणी, सविस्तर उलगडून त्याने ते मनुष्यांना सांगितले, ती गीता!

हा वेदार्थ सागरू जया निद्रिताचा घोरू
तो स्वये सर्वेश्वरु प्रत्यक्ष अनुवादला ।।

वेदांबाबत एक खंत देखील ज्ञानदेवांनी मोठ्या खुबीने मांडली आहे. वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण पित्याच्या पोटी जन्मलेल्या या परम बुद्धिमान लेकरांनाही तत्कालीन पढत पंडितांच्या दुराग्रहामुळे पराकोटीची अवहेलना सोसावी लागली. त्या अवहेलनेमुळं शूद्रांना वेदाध्ययनाचा अधिकार नाकारण्याच्या अन्यायाची जणू सह-अनुभूती त्यांना आली असावी. वेदांनी मर्यादित केलेला हा अधिकार गीतेनं व (खरंतर ज्ञानदेवांनी) कसा मोकळा केला, हे ते अठराव्या अध्यायात सांगतात.

वेदु संपन्नु होय ठाईं । परि कृपणु ऐसा आनु नाहीं।
जे लागला कानीं । तीहीं वर्णांचाचि ।।

वेद खरेतर मुळात अत्यंत ज्ञानसंपन्न होत. पण त्यांच्याइतका कृपण अन्य कोणी नाही. कारण ते केवळ तीन वर्णांच्याच कानी लागले, त्यांनाच केवळ वेद श्रवणाचा अधिकार असं म्हणून बसले. आणि ज्यांना

खरोखरच्याच विवंचना आहेत अशांना मात्र या ज्ञानमंदिरात प्रवेशाचा अवसर नाकारू लागले ..

येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां ।
अनवसरू मांडूनियां । राहिला आहे ।।

म्हणून मला असे ध्यानात आले की, या त्यांच्या पूर्वीच्या न्यूनत्वाचे परिमार्जन करण्याकरता वेद आता वेष बदलून गीतारूपात प्रकट झाले आहेत व त्या गीतामृताच्या सेवनाचा अधिकार आता त्यांनी सर्वांना देऊ केला आहे ..

तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें।
वेदु वेठला भलतेणें । सेव्य होआवया ।।

आपल्या मागच्या अपकीर्तीला तो भ्याला व ती धुऊन टाकण्याकरता त्यानं गीतामाउलीच्या पोटी पुन्हा जन्म घेतला. (आणि गीता वा ज्ञानेश्वरीतून हे ज्ञान सर्व लोकांकरता मुक्त झाल्यानं) आता त्याचं हे सद्वर्तन पाहून जनलोक आता त्याला चांगला म्हणू लागले आहेत!

यालागीं मागिली कुटी । भ्याला वेदु गीतेचां पोटीं।
रिगाला आतां गोमटी । कीर्ती पातला ।।

आणि असं हे गीतामृत आपल्याला काय देतं?

हे गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचे मथित।
आत्मा जेणे हस्तगत । रत्न होय ।।

वेद, उपनिषद आदी सर्व साहित्य-समुद्राचं मंथन केल्यानंतर निघालेलं हे ज्ञानाचं सार असं आहे, ज्याच्या योगे आत्मा नावाचं रत्न आपल्या हाती येतं !

कांडयंत्ररूपिणी । श्रुतीच हे कोडिसवाणी ।
गीता पद्यरत्नांची लेणी । लेयिली आहे ।।

गीतेला इथं 'कांडयंत्र' म्हटलं म्हणजे कर्मकांड (कर्मयोग), देवताकांड (भक्तीयोग), ज्ञानकांड (ज्ञानयोग) सांगणारी अशी ही कांडत्रयात्मक किंवा कांडयंत्र रूपिणी गीता असली, तरीही ती रुक्ष वा बोजड नाही - तर अतिशय कोडिसवाणी, गोजिरवाणी आहे ! आणि काव्यादी अलंकारांची लेणी ल्याल्यामुळे अति सुशोभित झाली आहे..

'श्रुतींचं कोडिसवाणं रूप' म्हटल्यावर यशोदेला आपल्या बालमुखातील लोण्याच्या गोळ्याऐवजी अखिल विश्वाचं दर्शन घडवणारा गोजिरवाणा, खट्याळ, मधुर कान्हाच दिसू लागतो.. जणू तो त्याचं तेच लाघव गीतेतूनही दर्शवतो आहे !

ज्ञानेश्वरीत कृष्णार्जुन संवाद सांगताना अनेकदा ज्ञानदेवांनी पुन्हा पुन्हा गीतेची महती सांगितली आहे .

ज्ञानामृत देणारी गंगा, ब्रह्मानंद देणाऱ्या चंद्राची सतरावी कला म्हणजे गीता, विचारसागराच्या मंथनातून बाहेर आलेली साक्षात अक्षरलक्ष्मी म्हणजे गीता !

हे ज्ञानामृताची जान्हवी ।
की आनंदचंद्रीची सतरावी ।
विचारक्षीरार्णवीची । लक्ष्मी जे हे ।।

पण गीता काही केवळ वेदशास्त्रचर्चेतून आलेले शास्त्र नव्हे. संसाराला म्हणजे संसारातील जे पेचप्रसंग त्याला जिंकण्याचे, त्यातून पार पडून आपल्या आतील आत्मतत्वाची भेट घडवून आणण्याचे मंत्र सांगणारी ही शब्दशस्त्रे आहेत. हे आचरणात आणण्याचे व आचरणाने सिद्ध करण्याचे, अनुभव घेण्याचे शास्त्र आहे ..

साचाचि बोलाचे नव्हे हे शास्त्र । पै संसार जिणते शस्त्र । आत्मा अवतरवी ते मंत्र । अक्षरे इये ।।

ज्ञानेश्वरी हा केवळ गीतेचा अनुवाद नाही. केवळ कोरडे प्रतिशब्द त्यात नाहीत. ज्ञानदेवांच्या उन्नत प्रतिभेला समाज केवळ ज्ञानी करायचा नव्हता तर आनंदानं भारून टाकायचा होता. अवघं विश्व समाधानात नांदावं याकरता

त्यांनी नाना मार्गांनी, युक्तीने सामान्यजनांना हा तत्त्वार्थ समजावून दिला.

त्याकरता त्यांनी गीतेच्या ज्ञानसरोवराला आपल्या अर्थविस्ताराच्या कमलदलांनी गजबजून टाकलं ! गीतेचा अर्थ माणसाच्या मनात मुरला की सारं जग म्हणजे आनंदाचं अंगण होईल हा विश्वास त्यांनी सांगितला .

तैसा वाग्विलास विस्तारु । गीतार्थे विश्वभरु ।
आनंदाचे आवरुं । मांडू जगा ।।

गीतेनं खरा सांगितला तो आत्मयोग गीता ऐकल्यानं काय साध्य झालं याचं उत्तर 'युद्ध जिंकलं' हे नाही !

अर्जुनाला आत्मज्ञान झालं का, त्याला शाश्वत आनंदाचा मार्ग सापडला का ?

त्याच्या प्रश्नाच्या निमित्तानं कृष्णानं त्याच्या प्रिय सख्याला आनंदाचं दर्शन घडवलं. शाश्वत सुखाच्या प्राप्तीचा मार्ग सांगितला. शोकमोहाच्या पलीकडचा आनंदाचा प्रदेश त्याला खुला केला. आणि मग,

तेथे निजानंदा बहुवसा। माजी अर्जुन तो सहसा।
हरपला चंद्रु जैसा । चांदणेनि ।।

लुकलुकणाऱ्या चांदण्यांच्या तेजाला असा भर यावा की प्रत्यक्ष चंद्रही त्यात हरवून जावा, तसा कृष्णाचं बोलणं ऐकून तो महापराक्रमी अर्जुन त्याच्या मनात उमटलेल्या निरामय आनंदकल्लोळात हरवून गेला.

गीतेची महती सांगताना ज्ञानदेवांनी किती उपमा द्याव्यात ! हे विवेकतरूचे अभिनव उद्यान – सर्व विद्यांचे मूळपीठ – सकळधर्मांचे माहेर – लावण्यरत्न भांडार आहे. गीता म्हणजे जणू 'महाबोधी कोवळीक दुणावली' ब्रह्मज्ञानाला कोमलता प्राप्त झाली व त्याची शोभा वाढली! सिद्धांताला मधुरता आली, चतुरतेला शहाणपणाची जोड लाभली, शृंगाराला सुरेखता आणि चांगल्याला मान्यता लाभली.. सर्व श्रुति स्मृतीचं मंथन करून जे लोणी काढलं ते महाभारत आणि ते पुन्हा ज्ञानरूपी अग्नीवर विवेकपूर्ण विचारांनी कढवल्यावर जे रवाळ खमंग तूप तयार झाले ती गीता.. किती तऱ्हेनं माउली आपल्याला समजावत आहेत गीतेचं महत्त्व.

गीतेचा ग्रंथ शोकेसमधे ठेवण्याकरता नाही. अन्य काहीच करणे शक्य नाही अशा अवस्थेत केवळ वाचन वा पठण करण्याचा तो ग्रंथ नाही. गीता आपल्याला आपल्या कर्मक्षेत्रावर पाय रोवून उभे राहून समस्यांचा स्वीकार व त्याचा सामना व निःपात करायला शिकवते. आपलं आयुष्य हे आपलं कुरुक्षेत्र. कर्तव्य करण्याचं स्थान. या कुरुक्षेत्रावर संभ्रमित-दिग्भ्रमित-हतोत्साहित होण्याची वेळ सर्वांवरच येते. त्यामुळं गीता सर्वकाळात मार्गदर्शक ठरत आली आहे. गीता हा आचरणधर्म. कोड ऑफ कंडक्ट ! लोकमान्य म्हणाले तसा तरुणांना मार्गदर्शन करणारा व तरुण वयातच अभ्यासला पाहिजे असा हा ग्रंथ. असं नाना प्रकारे गीतेचं महात्म्य ज्ञानदेव आपल्याला पटवून देतात आणि सांगतात –

म्हणौनि मनें कायें वाचां। जो सेवक होईल इयेचा।
तो स्वानंदसाम्राज्याचा। चक्रवर्ती करी ।।

आजच्या मोक्षदा एकादशीकडे मोक्ष मागायचा म्हणजे हेच मागायचं..

कशावरही अवलंबून नसणाऱ्या, कशानंही न डहुळणाऱ्या आणि कधी न संपणाऱ्या आनंदाचं वरदान म्हणजेच मोक्ष !

गीता वाचावी, म्हणावी, समजून घ्यावी आणि आचरणात आणावी.. मग स्वानंदसाम्राज्याचे धनी आपण होऊ असं आश्वासन आपल्याला भगवंतांनी दिलं आहे!

**– विनीता तेलंग**
ज्येष्ठ लेखिका
मुंबई

•••

# दुर्गाबाई भागवत : समूर्त नि:पक्षपाती विचारनिष्ठा

*दुर्गा भागवत या मराठी भाषेतील विदुषी त्यांचा जन्म दिवस नुकताच साजरा झाला. दुर्गाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनवट पैलूंवर प्रकाश टाकणारा लेख – संपादक*

''वाचनाची कक्षा बौद्धिक आणि ललित विषयांत विस्तृत असल्याने एक प्रकारची नि:पक्षपाती वैचारिक निष्ठा व बौद्धिक स्वातंत्र्य यांची प्रतिष्ठा माझ्या मनात आपोआपच तयार झाली. थोरो, मिल व टॉलस्टॉय यांसारख्यांचा परिचय झाल्यामुळे दुसऱ्याच्या विचाराला आपल्याइतकाच वाव मिळाला पाहिजे ही जाणीव प्रथमपासून मनात बाळगली. त्यामुळे मी व्यक्तिपूजक बनले नाही. कुठल्याही कंपूत अडकले नाही. विचारधारेशी इमान राखायचे इतकेच या थोर लेखकांपासून मी शिकले.''



आपल्या लेखनाविषयी तोच आपला आत्माविष्कार आहे असे म्हणत प्रतिबद्ध असणे ही मोठीच गोष्ट असते. त्यामुळे लेखनाचे विषय, प्रतिपादन, खंडनमंडनाचे मुद्दे हे एका अर्थी ठरीव होऊन जातात. पण आपल्या वाचनाविषयी, वाचनातून समोर आलेल्या तथ्यांविषयी नि:पक्षपाती वैचारिक निष्ठा आणि बौद्धिक स्वातंत्र्य यांची प्रतिष्ठा मनात असण्याची स्थिती साधण्यासाठी निर्भेळ प्रांजलपण असणं अपरिहार्य असतं. आणि ते काहीसं दुर्लभही होऊन जातं.

कदाचित हे अशा रूक्ष मांडणीतून तितकंस महत्त्वाचं वा वेधक वाटणार नाही. याचं एक सद्‌गुण म्हणून अस्तित्वही कदाचित जाणवणार नाही. म्हणूनच ह्या सद्गुणस्थितीला सगुण करण्यासाठी उदाहरणाची चेतनता देणे उपयुक्त ठरेल.

कधीतरी दारावर काही माहिती देणाऱ्या, पुस्तकं विकणाऱ्या व्यक्तीकडून एक लहानशी म्हणजे अगदीच लहानशी पुस्तिका दुर्गाबाईंच्या हाती लागली. नेटकं मुद्रण केलेली ती पुस्तिका त्यांच्या घरात पडून होती. कधीतरी काही निमित्ताने ती समोर पाहिल्यावर त्यांना स्वाभाविकच ती वाचावीशी वाटली. त्यांनी ती सहज म्हणून घेतली पण पुढे गुंतत गेल्याने मनापासून वाचली. आणि त्या विस्मयचकित झाल्या. त्याहूनही अधिक विचारमग्न झाल्या.

समाजशास्त्रीय अभ्यास म्हणून त्यांनी देशभरातील विविध परंपरा, रीतीभाती, विधीव्यवहार यांचे सखोल अवलोकन, अध्ययन केलं होतं. त्यांना त्यातील लक्षणीय वैविध्य जाणवलं होतं. त्या साऱ्यांतून वाहणारा समत्वाचा, एकत्वाचा प्रवाह त्यांना समजत होता; पण तो त्या सर्वांना कसा सांगणार, कसा सांधणार असे काही प्रश्नही ताठ उभे होते.

आणि ते प्रश्न विरून, विरघळून जावेत असं काहीसं त्यांना त्या पुस्तिकेत वाचायला मिळालं होतं. त्याचा त्यांना विलक्षण आनंदही झाला होता.

ती दारावर जेमतेम रुपयाला दिली गेलेली सकृतदर्शनी दुर्लक्षणीय पुस्तिका दुर्गाबाई भागवतांसारख्या विचक्षण विदुषीला मोलाची वाटावी असं त्या पुस्तिकेत होतं तरी काय?

आयुष्यात पैसा हवा; पण पैशात आयुष्य नको.

त्या पुस्तिकेचं नाव होतं 'एकात्मता स्तोत्र-मंत्र'!

घरोघरी जनजागरण, संपर्क वा साहित्यविक्रीसारख्या स्थानीय उपक्रमात कुणा अनाम संघ कार्यकर्त्याने ते घडवून आणलं होतं. त्याने ते दुर्गाबाईंना म्हणून दिलंही नसेल. अन्य पंचवीस घरांसारखीच त्याने दुर्गाबाईंच्या घराची घंटा वाजवली असणार. त्याने सहजपणे केलं पण त्याचा परिणाम खूप मोठा होता.

दुर्गाबाईंना ती पुस्तिका, त्यातील राष्ट्रीय एकात्मता हे लक्ष्य आणि त्याच्या सिद्धिसाठी केलेली श्लोकरचना हे सारंच खूप महत्त्वाचं वाटलं होतं. ते सर्व मनात उतरवून त्या स्वस्थ बसल्या नाहीत. त्यांना ते अनेकांना सांगण्याइतकं महत्त्वाचं वाटलं.

त्यांनी ते 'एकात्मता स्तोत्र-मंत्र' बारकाईने वाचून त्याच्यावर टिपण लिहून काढलं. तेव्हा त्या तत्कालीन एक सायंदैनिक 'आज दिनांक'मध्ये साप्ताहिक स्तंभ लिहित होत्या. कपिल पाटील त्याचे संपादक होते, जे आज छात्रभारती संघटनेचे कार्यकर्ते आणि विधान परिषदेत आमदार आहेत. स्तंभाचं नाव होतं 'गोधडी'! त्या स्तंभासाठी ते त्यांनी प्रसिद्धीला दिलं आणि ते प. पू. डॉ. हेडगेवारांच्या छायाचित्रासह प्रकाशितही झालं. (तिथे प. पू. श्री गुरुजींचं चित्र का नसावं असा प्रश्न तेव्हाही पडलाच होता...)

आपल्या लेखात दुर्गाबाईंनी एकात्मता मंत्राचा एक श्लोकही उद्‌धृत केला होता. त्यामागची प्रेरणा म्हणून प. पू. श्री गुरुजींच्या चिंतनाविषयी आग्रहाने लिहिलं होतं. एखाद्या संघटनेचं तेहतीस वर्षे नेतृत्व केलेल्या व्यक्तीने देशभ्रमणातून, अवलोकनातून हा मंत्र मिळविल्याचे गौरवाने नमूद केलं होतं. अशी व्यक्ती देशकल्याणाचाच, एकत्वाचाच विचार करील अशी ग्वाहीही दिली होती.

दुर्गाबाईंनी एका अर्थी वाचन ते आकलन आणि पुढे आकलन ते लेखन असं वर्तुळ पूर्ण केलं होतं. वाचलेलं रुचलं तरी ते आपल्या आजवरच्या विचारव्यूहाहून वेगळं आहे म्हणून नाकारलं वा उपेक्षिलं नाही. एवढंच नव्हे तर त्यावर आपलं प्रांजळ मत व्यक्त करणारा, प्रशंसा करणारा लेख लिहिला आणि आपल्या स्तंभात प्रकाशित करविला.

आरंभी दुर्गाबाईंचे एक अवतरण दिलं आहे. त्यात त्यांनी आपल्या वाचनाविषयी आणि नि:पक्षपाती वैचारिक निष्ठा व बौद्धिक स्वातंत्र्याविषयी लिहिलं आहे. दुर्गाबाईंचा 'गोधडी' सदरातील लेख त्या प्रतिपादनाचं कृतिरूप होतं.

आकाशातून उतरलेलं चांदणं तलावाच्या पृष्ठावरून पाण्यात चमचमत रहावं तशी व्यवहारातून तळपणारी विचारनिष्ठा प्रकट करणाऱ्या दुर्गा भागवत नावाच्या तेजस्वितेला आज त्यांच्या जन्मदिनी विनम्र अभिवादन. व्यक्तीपूजा न करता, कोणत्याही कंपूत न शिरता वा कोणत्याही कंपूशाहीला न जुमानता असं स्वतःला पुन्हा पुन्हा तपासत, विकासत राहण्यासाठी अशी विवेकनिष्ठा आज दिसते का? दिसायला हवी असेल तर असं संस्मरण आवश्यक ठरतं.

जाता जाता : पुढे काही वर्षांनी त्यांचा 'गोधडी' हा लेखसंग्रह प्रकाशित झाला. त्यात 'आज दिनांक'मधील स्तंभातील अनेक लेख आहेत. दुर्दैवाने हा लेख नाही.

का? ठाऊक नाही. कुणामुळे? कुणी हेतूत: वगळला का? कुठलाच तर्क करायचा नाही!

पण त्या कुणातरीमुळे चांदणं थोडं गढूळलंच.

दुर्गाबाईंच्या जन्मदिनी त्यांना कृतज्ञतेने नमन करताना पुन्हा 'आज दिनांक'चं ते पान डोळ्यांसमोर फडफडलं.

**- प्रमोद वसंत बापट**

●●●

# मराठी भाषा गौरव दिन

*सध्या दैनंदिन व्यवहारांमध्ये आपण बरेचदा अगदी सहजतेने आणि आपल्याही नकळत इंग्रजी शब्दांचा सर्रास वापर करतो. अर्थात ते इतकं अंगवळणी पडलय की त्यामुळे कुठेतरी मराठीकडे दुर्लक्ष होते ही जाणीवच आपल्याला होईनाशी झालीय. याला अपवाद इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणारी आपली पुढची पिढी सुद्धा नाही. खरंतर इंग्रजी शिकत असताना मराठीचं बोट धरत तीही तितक्याच समर्थपणे या पुढच्या पिढीने पुढे न्यायला हवी. कारण प्रत्येक बारा कोसांवर बदलणाऱ्या भाषेला प्रवाही आणि संक्रमित ठेवण्याची सर्वात मोठी जबाबदारी येणाऱ्या पिढ्याच सांभाळत असतात. त्या अनुषंगाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हा लेख नक्कीच विचार प्रवर्तक ठरेल- संपादक*

२७ फेब्रुवारी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज अर्थात विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस. त्यांच्या मराठी साहित्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून आपण त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करतो. मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

पण असं असलं तरी सध्या भोवताली असलेली परिस्थिती पाहता 'आपुल्या घरात हाल सोसते मराठी' अशी काहीशी आपल्या मराठीची अवस्था झालेली दिसते.

अगदी सुरुवातच करायची झाली तर घरापासूनच करू या. इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांमध्ये सध्या ना धड इंग्रजी ना धड मराठी अशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. दीड-दोन वर्षांपूर्वी टाळेबंदी जाहीर झाली होती आणि ती बरेच दिवस सुरू होती. त्या दिवसात आभासी माध्यमातून शिक्षण सुरू होतं आणि अर्थातच घरातला प्रत्येक पालक आपल्या मुलांसोबत शिकत होता. याला अपवाद मीही नव्हते. माझ्या लेकीची ती घरून अभ्यास करण्याची पहिलीच वेळ. त्यामुळे आम्ही दोघी अभ्यासावर छान गप्पा मारायचो.

एक दिवस ती मला म्हणाली, 'आई शाळेच्या ग्रुप वर मेसेज आलाय. टीचरने मराठीचा अभ्यास करायला सांगितलाय.' सातवीतल्या माझ्या लेकीचं ते वर्क फ्रॉम होम मला मजेशीर वाटलं. कारण तिच्या शब्दात अभ्यास मराठीचा करायचा होता.

मी तिला म्हटलं, 'अगं, आता बरेच दिवस प्रत्यक्ष शाळा भरणार नाही म्हणून तुमच्या बाईंनी घरूनच अभ्यास करायला सांगितला आहे आणि मराठीचा म्हणतेस तर जरा विचार कर बरं! तुझ्या आत्ताच्या वाक्यात किती इंग्रजी शब्द आले ते?' ती विचारात पडली. तिने ते वाक्य वहीत लिहिलं आणि म्हणाली, ''तीन शब्द आलेत. ग्रुप, मेसेज आणि टीचर.''

''वा! म्हणजे तुझ्या हे लक्षात आलं तर.. चल आता तुझ्या मराठीचा अभ्यास करू या. पण एक अट आहे. तू किंवा मी बोलताना एकही यावनी शब्द वापरायचा नाही.'' यावर ती माझ्याकडे आणखी प्रश्नार्थक नजरेने पाहू लागली. मी म्हटलं, ''अगं, यावनी म्हणजे इंग्रजी.''

ती लगेच म्हणाली ''ओके डन'' आणि आम्ही दोघीही खळखळून हसलो आणि असा आमचा मराठीचा अभ्यास सुरू झाला..

व्याकरणाच्या आणि शब्द निवडीच्या तिच्या प्रत्येक चुकांवर तिला समजावून सांगत माझा हा अभ्यास तिच्यासोबत सुरू होता..

मनात विचार आला, 'मराठी ही तिची मातृभाषा. पण खरंच या इंग्रजीच्या आक्रमणाने ती मातृभाषेपासून

दुरावत चालली आहे का? ती म्हणण्यापेक्षा एकंदरीतच आपली पुढची पिढी?

मातृभाषा म्हणजे काय हो ? इंग्रजीत आपण मदर टंग म्हणतो किंवा मराठीत आईची भाषा असं म्हणतो. पण बरेचदा वर्गामध्ये बहुभाषिक मुलं शिक्षण घेत असतात. मराठी माध्यमातून शिकत असतात. पण मुळात ती तमिळ, गुजराती, बंगाली, पंजाबी अशा विविध प्रांतातून आलेली असतात. मग त्यांची मातृभाषा कोणती? साहजिकच उत्तर येतं, – 'त्यात काय ? त्यांची त्यांची जी काही मातृभाषा असेल ती. अर्थातच वेगवेगळी असेल'.

पण समजा, एखाद्याला तमिळ पेक्षा मराठी जास्त जवळ वाटत असेल तर किंवा त्याच्या मातृभाषेपेक्षा तो ज्या परिसरात वाढला रुजला, त्या भाषेत तो अगदी सहजतेने अभिव्यक्त होऊ शकत असेल तर? मग तीच त्याची मातृभाषा असायला हवी ना! जर ती मराठी असेल तर त्याची मातृभाषा मराठीच असायला हवी. म्हणजेच मातृभाषा म्हणजे आईची भाषा नसून 'आई सारखी भाषा'. आणखी सोपं करून सांगायचं झालं तर, ज्या भाषेत आपण विचार करतो, स्वप्न पाहतो, सहजपणे आपली मतं मांडू शकतो ती भाषा आपली मातृभाषा.. मग तिथे गरज नाही की ती आपल्या आईची किंवा वडिलांची भाषा असेल ..

परिसरात आपल्या आजूबाजूला सहजपणे जी कानावर पडते, जी मला सोपी, सहज वाटते, ज्यात मी खूप मोकळेपणाने विचार मांडू शकते, ती माझी मातृभाषा. म्हणजे एखाद्या गुजराती मुलीची आई जर घरात गुजराती बोलत असेल पण मुलीला मराठी भाषा जवळची वाटत असेल तर त्या मुलीची मराठी ही मातृभाषा असू शकते. कारण जन्म झाल्यापासून ती मुंबईत राहते आणि अगदी लहानपणापासून मराठी तिच्या कानावर पडते. जी गुजराती पेक्षा तिला जास्त जवळची वाटते. म्हणूनच मातृभाषा म्हणजे आईची भाषा नाही तर आईप्रमाणे आपल्या भावविश्वाला आंजारून, गोंजारून आपल्याला समृद्ध करणारी, जवळची वाटणारी भाषा.. मनाला आनंद देणारी, माझ्या आई सारखी भाषा..

असं काहीसं मी माझ्या लेकीला समजावून सांगितलं आणि विचारलं, 'मग आता मला सांग तुझी मातृभाषा कोणती?' त्यावर ती म्हणाली, 'मी शिकते इंग्लिश मीडियम मध्ये पण मराठीत बोलायला मला जास्त आवडतं. मग माझी मातृभाषा मराठीच ना?'

''अगदी बरोबर.'' माझ्या लेकीला इतकं समजलं याचाच मला खूप आनंद झाला.

''तू लॉकडाऊन बद्दल बोलत होतीस ना. आता मला सांग लॉकडाऊन म्हणजे काय?'' म्हणाली, ''सगळं बंद.''

''म्हणजे थोडक्यात हे बंद दिवस आता पुन्हा आपल्या आयुष्यात येणार नाहीत. हा आता भूतकाळ होईल. मग असा कधी विचार केलास का, की आता मी आठवीत जाणार. म्हणजे सातवीपर्यंतच्या सर्व दिवसांना मी लॉकडाऊन करणार.. आता तो माझा भूतकाळ होणार.. हो की नाही..?''

अगदी आनंदाने तिनं मान डोलावली.. संवादला पुढे नेत मी म्हटलं, ''मला सांग, मराठीत तुला काय जास्त आवडतं? कविता की धडा?''

यावर ती पुन्हा विचारात पडली. ''अगं, पोएम की लेसन?'' हा. म्हणाली, ''मला पोएम आवडते.''

''का''

''लिस्ट वर्ड्स मध्ये त्यात खूप काही सांगितलेलं असतं.'' ''अगं लिस्ट वर्ड्स म्हणजे कमीत कमी शब्द म्हणावं. कविता म्हणजेच ते. जे कमीत कमी शब्दांत खूप काही सांगून जातं.''

''हो ग आई. पण मला समजेल असं सांग ना.''

जरा त्रासूनच तिने सांगितलं.

आता माझ्यातली शिक्षिका जागी झाली. तिला काही स्पष्टीकरण देण्यापूर्वी तिला आणखी एक प्रश्न विचारला, ''कविता आणि धडा यात तुला मुख्य फरक काय दिसतो सांग?''

लगेच खांदे उडवत म्हणाली, ''कविता छोटी आणि धडा मोठा असतो.''

तिच्या याच फरकाला आणखी एक स्पष्टीकरण देत मी सांगितलं, ''अजून एक सांगू ? कवितेत तुला पूर्णविराम दिसत नाही. म्हणजे नो फुल स्टॉप.''

तिने विचारलं, ''का?'' ''कारण ते वाक्य नसतं. म्हणजे त्यात क्रियापद नसतं. थोडक्यात; जे वाक्य नाही ते काव्य..''

''अगं, शब्द तेच असतात, त्यांची सोबतही तीच असते. फक्त काना, मात्रा, वेलांटी यांची जागा बदलायची म्हणजे आपोआप वाक्याचं काव्य होतं.''

जरा गोंधळात पडल्यासारखी तिची अवस्था झाली. म्हणाली, ''एखादे उदाहरण दे ना.''

''बरं.. एक खेकडा होता. वाक्य पूर्ण झालं. पूर्णविराम आलं. आता शब्दांची अदलाबदल कर. क्रियापद मध्ये घे. एक होता खेकडा. झाली कविता.''

शब्दांची ही गंमत ऐकताना तिला खरोखरी गंमत वाटली. याच तिच्या उत्सुकतेला थोडं पुढे नेत मी म्हटलं, ''मला सांग, सगळ्यात पहिल्यांदा या तुझ्या पोएमची तुला कधी ओळख झाली? म्हणजे तुला आवडणारी पहिली कविता कोणती?''

''मला आठवतंय ना! रात्री मला झोपवताना ग्रँडमा लालबाय म्हणायची. ती पहिली पोएम.

''आठवतंय हेच खूप झालं, पण या ललबायला मराठीत काय म्हणतात?''

''ए आई, असं काय करतेस? अ..ग..आई असं काहीसं म्हणतात..''

कपाळावर हात मारत मी म्हटलं, ''अग बाई, अ..ग..आई नाही.. 'अंगाई' म्हणतात त्याला.. म्हणजे तू बाळ असताना तुला झोप लागण्यासाठी आजी ते गाणं म्हणजे अंगाई म्हणायची ते..''

''कधी कधी मीही म्हणायचे आणि अंगाई म्हटली की तू लगेच झोपी जायचीस. कारण तो आवाज तुला ओळखीचा वाटायचा. त्यामुळे तुला सुरक्षित वाटायचं आणि तू गाढ झोपयचीस. असा आहे बरं अंगाई आणि बाळाचा संबंध!''

''तुला माहीत आहे? बाळाचा आणि पाळण्याचा हा कनिष्ठ संबंध स्पष्ट करताना एका साहित्यिकाने पाळण्याला 'गर्भाशयाचं एक रूप' असं म्हटलंय. बाळाला काहीच कळत नसतं पण तरीही त्या सुरक्षिततेचा खोल संस्कार त्यावर होत असतो, म्हणून पाळणा आणि अंगाई यांच्यासोबत ते गाढ झोपी जातं. कळलं का अंगाई म्हणजे काय? बरं अंगाई नंतर काय आठवतंय?''

''लहानपणी तुम्ही सगळे मला जेवण भरवताना गाणी म्हणायचात. खूप गमतीदार, मजेशीर, मला खूप हसायला यायचं आणि मी जेवायचेसुद्धा..''

''बरोबर ! त्यांना 'बडबड गीते' म्हणतात.''

''हा हा हा...बडबड तर आम्ही नेहमीच करतो.''

''अगं ती बडबड आणि ही बडबड गीतं. मुलांना या बडबड गीतातून भाषेच्या गमती जमती समजावून सांगणाऱ्या या गीतांना इतकं समर्पक नाव देणारे आपले पूर्वज खरोखरी किती महान होते ना! एक विचार चटकन मनात येऊन गेला. हो, बरोबर आहे तुझं. या बडबड गीतांना फारसा काही अर्थ नसतो. म्हणून याला इंग्रजीत नॉन्सेन्स हाईम्स असे म्हणतात. फक्त नाद, ठेका, सुटसुटीत मजेशीर शब्द, लयबद्ध शब्द, ध्वनी अशा गोष्टींना या

बडबडगीतांत महत्त्व असतं. अर्थ नसला तरी चालतो. फक्त ते म्हणताना आनंद, मजा, गंमत वाटली पाहिजे. म्हणूनच तर या 'निरर्थिका'. निरर्थिका म्हणजे अर्थ नसलेल्या आणि याचं पुढचं प्रगत रूप म्हणजे वात्रटिका. जिथे मात्र अर्थ असणं फार महत्त्वाचं असतं.''

मला मध्येच थांबवत उत्सुकतेपोटी लेकीनं विचारलं, ''आई अंगाई गीत आणि या बडबड गीतांची सुरुवात कशी झाली? म्हणजे कुणाला सुचली? कोणी लिहिली?''

''कोणी लिहिली? हे निश्चित सांगता येणार नाही. कारण मी माझ्या आईकडून, माझ्या आईने तिच्या आईकडून, तिच्या आईने तिच्या आईकडून असं हे पिढ्यान्‌पिढ्या पुढे पुढे येत राहिलं. प्रत्येक पिढीकडून त्यात भरच पडत गेली. हे सगळं मौखिक म्हणजे तोंडी काम बरं का! तुम्ही ओरल म्हणता ना तसं.. या तोंडी बोलण्याला संस्कृत मध्ये 'वाच्या' असं म्हणतात. थोडक्यात वाचेवरून वाचेकडे पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित झालेलं हे वाचामय म्हणजे 'वाङ्मय'. समजलं का? त्या त्या भाषेतील मजेदार लोकगीतांतून अनेक शतकांपूर्वी या गीतांचा प्रवास सुरू झाला. मुलांचं मनोरंजन करण्याचं प्रभावी साधन म्हणून लोकवाङ्मयाच्या या मौखिक परंपरेमध्ये तुमच्या या बडबड गीतांना फार महत्त्वाचं स्थान आहे ! एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सहज वाटचाल करणारी ही बडबड गीतं!''

''हे सगळं तोंडी म्हणजेच ओरली पिढ्यान्‌पिढ्या चालत आलं; बरोबर? पण तू तर म्हणतेस की, आपलं बरचसं वाङ्मय लिहिलेलं आहे. जर तोंडीला वाङ्मय म्हणतात तर लिखितला काय म्हणतात?''

''वा ! छान प्रश्न विचारलास. त्याला म्हणायचं साहित्य.''

मान डोलावत लेक म्हणाली, ''ओके. म्हणजे जे ओरली आहे ते वाङ्मय आणि जे रिटन आहे ते साहित्य.''

मीही जास्त खोलात न जाता मान हलवली. आता मात्र जरा फारच बौद्धिक झालं होतं म्हणून लेकीने दोन-तीन बडबड गीतं म्हणून दाखव असा हट्ट धरला.

मीही माझ्या बालपणात रमले आणि आठवतील तशी काही बडबड गीत तिला ऐकवली. तुम्हालाही आवडतील पहा.

एकदा एक चित्ता
हातात घेऊन अडकित्ता ।
चित्ता आला दुपारी
मागू लागला सुपारी ।
मी म्हटलं, 'कशाला'
तेव्हा चित्ता म्हणाला -
'नुकतंच जेवण झालं फक्कड
खाऊन टाकले बारा बोकड'
'१२ बोकड, १६ शेळ्या
बघता बघता फक्त केल्या ।
'नंतर थोडी गंमत म्हणून
तीन कोंबड्या टाकल्या खाऊन ।'
'जेवण जरा जड झाले
भलतेच अंगावर आले'।
'म्हटले खावी सुपारी
म्हणून आलो दुपारी!'

एवढा मोठा भोपळा
आकाराने लांबोडा ।
त्यात बसली म्हातारी
म्हातारी गेली लेकीकडे
लेकीने केले दहिवडे ।

दहिवडी झाले घट्ट
म्हातारी झाली लठ्ठ
ससोबा साजरे
खातात गाजरे
या की जरा जवळ
भारी तुम्ही लाजरे

अशी गीतं रंगत गेली आणि आम्ही दोघीही लहान झालो. खरं तर हा संवाद बराच वेळ सुरू होता.

पण मंडळी; आज मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने हे तुम्हाला सांगताना खरोखरी आपल्या भाषेचा हा सुरेख प्रवाह पिढ्यान्पिढ्या असाच वाहात राहिला पाहिजे याची अगदी तीव्रतेने गरज वाटू लागली. आपण मराठीत बोलायला हवं, वाचायला हवं, ऐकायला हवं, लिहायला हवं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मराठीचाच आग्रह धरायला हवा.

म्हणजे मुलांना पेन 'भेटणार' नाही. ते 'सापडेल'. त्यांना मी 'आली' आणि मी 'आले' यातला फरक समजेल. राहुल रस्त्यात 'सांडला' असं म्हणण्यापेक्षा राहुल 'घसरून पडला' हे क्रियापद त्यांना आठवेल. मी चहा 'पिली' असं न म्हणता, 'मी चहा' प्यायले असं ते म्हणतील. बरोबर ना!

या सकारात्मक आशेसोबतच या लेखाचा समारोप करताना पुन्हा एकदा मराठी भाषा गौरव दिनाच्या भरभरून शुभेच्छा आणि हो; १ मे रोजी येणाऱ्या 'मराठी राज्यभाषा दिना'च्याही खूप खूप शुभेच्छा.

**– सौ. साधना योगेश जोशी**

•••

(पृष्ठ क्र. १२ वरून – **समीक्षा – डीएनए चा आक्रोश**)


संस्कृत भाषेचा अभ्यास व आवड 'वेद' ह्या कथेत वेदप्रकाशच्या निवेदनात आहे. सुश्रुताच्या शल्यक्रियेची माहिती लेखनातून जाणवते. पुराणकथेतील विचाराला आधुनिक जोड भविष्यात कशी असेल ही काल्पनिकता त्यात आहे. परग्रहवासी पृथ्वीवर येऊन कथेत एक शल्यचिकित्सक पात्र होतो. टाइम मशीनच्या सहाय्याने अद्भुततेचा स्पर्श विज्ञानाला दिलाय.

अगदी २०५० ते ३१ साव्या शतकापर्यंत ही कल्पनेची भरारी आहे, पण त्यातील वैज्ञानिक पाया भक्कम आधार आहे ही लेखकाची खरी ताकद आहे आणि कथांचा तो लवचिक कणा आहे. विज्ञानाबरोबर भूगोल, इतिहासाचा स्पर्श भाषेत आहे. वैज्ञानिकतेचा आग्रह मात्र निश्चितच जाणवतो. त्यामुळे वाचकांच्या ज्ञानात विज्ञानाची भर पडते. वैज्ञानिक सत्याचा लख्ख प्रकाश कथासंग्रहात आहे. कथा-बीजाला कल्पनेचे पंख लावून केलेले वर्णन रोचक आहे, केवळ भाषेचा फुलोरा नाही, तर वैज्ञानिक अनुभवाचे व प्रायोगिकतेचे खडे बोल आहेत.

विज्ञानविषय वैविध्य व तदनुरूप उद्बोधनही ह्यामुळे हा कथासंग्रह वाचनीय झाला आहे.

**– डॉ. रंजन गर्गे**

•••



# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

दि. ९ डिसेंबर २०२२ रोजी पिलाई कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पनवेल येथे आयोजित केलेल्या Mekerthon 2022 परिसंवादासाठी डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) शाळेतील इ. ८वी, ९वी चे विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी, 'अन्नघटकातील ऊर्जा' प्रत्यक्ष प्रतिकृतीने बनवली व प्रात्यक्षिक सादर करून अन्नातील ऊर्जा कॅलरी मीटरमध्ये रूपांतर करून मोजून दाखविली. श्री. शिरापुरी व श्री. देवघरे मार्गदर्शक म्हणून हजर होते.

**स्काऊट – गाईड**

- ऑक्टो. २०२२ मध्ये हिमाचल प्रदेश, मनाली येथे नॅशनल ॲडव्हेन्चर कॅम्प मध्ये ४ स्काऊट आणि ४ गाईड सहभागी झाले होते.
- वैष्णोदेवी येथे नॅशनल ट्रेकमध्ये १ गाईड सहभागी झाली. सौ. बोरवणकर यांचाही सहभाग.

**डॉ. श्रीनिवास रामानुजन जन्मदिन :–**

गुरुवार दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी 'राष्ट्रीय गणित दिन' साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने श्री. शिरापुरी यांनी विद्यार्थ्यांना, 'गणिताचे आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचे स्थान' याबद्दल माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी डॉ. रामानुजन यांबद्दल माहिती सांगितली. सदर कार्यक्रमास इ. ७वी अ, ब व ९वी डचे विद्यार्थी, तसेच सौ. झंझाड उपस्थित होत्या.

- दि. १२ व १३ सप्टेंबर २०२२ रोजी जनरल एज्युकेशन इन्स्टिटट्युट तर्फे संस्था पातळीवरील कै. श्री. नी. त्र्यं. केळकर चित्रकला स्पर्धा लहान शिशु गटापासून ते १० वी पर्यंत होती. त्या स्पर्धेचे परिक्षणाचे काम श्री. वासुदेव वैद्य यांनी पार पाडले.

- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांच्या The Digital Audio processing lab electrical engineering विभागातर्फे टाटा सेंटर ने sponsored केलेल्या प्रकल्पात 'विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य' विकसित करण्यासाठी एका tablet based Mobile app ची निर्मिती करण्यात आली.

डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्य. विभागातील इ.५वी ते १०वी च्या प्रत्येक तुकडीतून प्रत्येकी पाच अशा १२० विद्यार्थ्यांची निवड केली गेली.

विद्यार्थ्यांचे प्रकटवाचनातील उच्चार, प्रवाहीपणा तपासून त्यानंतर मार्गदर्शनाने app द्वारे वाचन चाचणी घेऊन ती यशस्वीरित्या पार पडली. दि. २१ डिसेंबर २०२२ रोजी शाळेला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याकामी शाळेतील शिक्षिका सौ. दडपे व सौ. दातार यांनी सहकार्य केले.

प्रो. प्रीती राव व त्यांचे सहाय्यक श्री. केशव अग्रवाल व श्री. रवींद्र गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने मार्गदर्शन केले.

- ब्राह्मण सेवा संघ आयोजित स्पर्धा दिनांक ७/१/२०२३ रोजी इ. ५वी ते ७वी साठी फलश्रुतीसह अथर्वशीर्ष स्पर्धा व इ. ८वी ते १०वी साठी कथाकथन स्पर्धा आयोजित केली होती. सौ. जोशी, सौ. दडपे, सौ. दातार यांचे मार्गदर्शन लाभले.

- दि. ३/१/२०२३ (मंगळवार) रोजी इ. ६वीच्या सर्व तुकड्यांचे विद्यार्थी व शिक्षक यांच्यासमवेत

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंचे बालपण, सामाजिक कार्य, समाजातील अनिष्ट रूढी परंपरा बंद करण्यात मोलाचे कार्य इ. विषयी माहिती दिली.

**क्रीडा विभाग**

◆ १ डिसेंबर २२ ते ३ डिसेंबर २२ या कालावधीत शाळेत वार्षिक क्रीडामहोत्सव साजरा करण्यात आला.

खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, लंगडी, १००मी. रिले, धावणे अशा विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला. क्रीडामहोत्सवाचे उद्‌घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांच्या हस्ते झाले.

◆ जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या तर्फे शालेय क्रीडा स्पर्धा घेतल्या गेल्या. त्यातील ‘बुद्धिबळ’ या क्रीडा प्रकारात इ. ७वी/अ मधील कु. अथर्व कदम या विद्यार्थ्याची विभागीय स्पर्धेसाठी जिल्हा संघात निवड झाली आहे.

◆ दृष्टी प्रकाश देसले इ. ८वी (अ) या विद्यार्थिनीला कराटे या क्रीडा प्रकारात रौप्य पदक प्राप्त झाले.

◆ जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात आलेल्या कबड्डी व खो-खो स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींचा खो-खो संघ जिल्हा पातळीवर उपविजयी ठरला. तसेच १७ वर्षांखालील मुलांच्या खो-खो संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

◆ कु. श्वेता मंगेश कदम इ. ८वी च्या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी जिल्हा कबड्डी संघाच्या किशोरी गटात निवड झाली.

◆ दि. ६/१/२०२३ ते दि. ८/१/२३ या कालावधीत वायूदूत क्रीडा मंडळ ठाणे यांच्यावतीने कै. रंजन कोळी स्मृती चषक (कुमार-कुमारी गट) जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा संपन्न झाल्या.

या स्पर्धेत कुमार गटात कु. प्रयाग खेडेकर व कुमारी गटात कु. समिक्षा करवंदे यांना उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली. स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित केले.

**इ. १०वी साठी करियर गाइडन्स आणि वेळेचे नियोजन**

◆ दि. ३१/१२/२२ रोजी VPM's Polytechnic Thane यांच्या वतीने इ. १०वी सर्व विद्यार्थ्यांसाठी करियर गाइडन्स संबंधी माहिती देण्यात आली. मा. उपमुख्याध्यापिका कु. कल्पना वाघुले यांनी आभार मानले.

◆ दि. ६/०१/२०२३ शुक्रवार रोजी जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्था महाराष्ट्र यांच्यावतीने इ. १०वी साठी करियर गाइडन्स व वेळेचे नियोजन या संदर्भात माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ. पुष्कर शेजवलकर व इ. १०वीला शिकवणारे सर्व शिक्षक उपस्थित होते. श्री. बन्ने सर यांनी आभार मानले.

◆ दि. १०/१/२०२३ मंगळवार रोजी S.C.K. Foundation यांच्यावतीने श्री. रावत सर यांनी १०वी च्या सर्व विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन व करियर गाइडन्स या संदर्भात माहिती सांगितली. त्या कार्यक्रमात १०वी चे सर्व शिक्षक उपस्थित होते.

◆ ब्राह्मण सेवा संघातर्फे आयोजित स्पर्धांमधील विद्यार्थ्यांचे यश

◆ शनिवार दि. ७/१/२०२३ रोजी ब्राह्मण सेवा संघातर्फे आयोजित केलेल्या ‘प्रज्ञाविवर्धन स्त्रोत’ या स्पर्धेतील विद्यार्थी :-

तृतीय क्रमांक : कु. दीपिका खंडागळे (८वी अ)

उत्तेजनार्थ क्रमांक : प्रथम - क्रीपा पाटील (८वी अ)

द्वितीय - गीतेश पाटील (८वी अ)

मार्गदर्शक शिक्षिका - सौ. सई दडपे

- इ. ५वी ते ७वी साठी 'फलश्रुतीसह अथर्वशीर्ष' द्वितीय क्रमांक - आदित्य अ. खोत (५वी अ)
- **८वी ते १०वी साठी कथाकथन स्पर्धा**
  द्वितीय क्रमांक-श्रावणी आनंदा जाधव (८वी अ)
  तृतीय क्रमांक - आर्या दिनेश जगताप (८वी अ)

मार्गदर्शक शिक्षिका - सौ.जोशी, सौ.दडपे, सौ.दातार

- **चित्रकला स्पर्धा**

दि. ६ मे २०२२ रोजी प्राच्यविद्या अभ्यास संस्था ठाणे आयोजित चित्रकला स्पर्धा

'The magical world of Raja Ravi Varma' पेंटिंग वर्कशॉपमध्ये चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

**यशस्वी आणि पारितोषिक प्राप्त विद्यार्थी -**

प्रथम क्रमांक - कु. मृणाली संतोष मोरे
द्वितीय क्रमांक - कु. शर्मिला संजय गावित
उत्तेजनार्थ - कु. समृद्धी दत्तात्रय धायगुडे
मार्गदर्शक शिक्षक - श्री. कोळी, श्री. वैद्य, श्री. दिघे

- **चित्रकला विभाग -**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये शासकीय चित्रकला परीक्षा सप्टेंबर महिन्यात घेण्यात आली. या परीक्षेत आपल्या शाळेतील इलेमेंटरीसाठी ९३ विद्यार्थी तर इंटरमिजिएटसाठी १७ विद्यार्थी प्रविष्ट झाले.

मार्गदर्शक शिक्षक - श्री.कोळी, श्री.वैद्य, श्री.दिघे

- **NCC Naval - शैक्षणिक वर्ष २०२२-२३**

1 MAH NAVAL UNIT MUMBAI मध्ये द्वितीय वर्षात (इ. ९वी) २६ कॅडेट्स व प्रथम वर्षात (इ. ८वी) - २४ कॅडेट्स, एकूण ५० कॅडेट्स NCC NAVAL साठी प्रविष्ट आहेत.

मार्गदर्शक शिक्षक - CTO श्री. संजय दिघे

**NCC NAVAL 2021-2022 निकाल पुढीलप्रमाणे -**

| कॅडेट्स | 'A' ग्रेड | 'B' ग्रेड | निकाल एकूण |
|---|---|---|---|
| २४ | २० | ०४ | १००% |

सायबर सुरक्षा जनजागृती दि. २३/१/२०२३ Quick Heal Foundation तर्फे बांदोडकर महाविद्यालयातील आदित्य मोरे व राज धुमाळे या स्वयंसेवकांनी इ. ५वी व ७वी च्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा संदर्भात उपयुक्त माहिती दिली.

- बेडेकर कॉलेज आणि संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या गीतापठण स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे यश

द्वितीय क्रमांक - कु.पार्थ संदीप भोईर (९वी ब)

- **राष्ट्रीय मतदार दिवस**

बुधवार दि. २५ जानेवारी २०२३ रोजी शाळेत राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने मा. मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांनी इ. ९वी च्या विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व विषद केले.

श्री. कोळी सरांनी मतदार दिवसानिमित्त शासनाकडून प्रसारित केलेले गाणे ऐकवले. तसेच सौ. झंझाड बाईंनी मतदार दिवसाची या वर्षीची थीम सांगून या दिवसाचा इतिहास सांगितला आणि शपथ दिली.

- पर्यावरण दक्षता मंच तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विद्यार्थिनींचे यश -

१) अंतरा सचिन पाटील
२) अदिती शिवाजी फडतरे
३) किमया सुनील दवंडे

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दिनांक १६ डिसेंबर रोजी पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. सुधाकर आगरकर यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे नाट्य व नृत्याद्वारे सादरीकरण केले. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या विषयावर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात क्रीडा अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शाळेचा वार्षिक क्रीडादिन दि. २१ व २२ डिसेंबर रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणा कॉलेजच्या मैदानावर घेण्यात आला. त्यात वैयक्तिक व सांघिक खेळांचा समावेश होता. धावणे, अडथळा शर्यत, डोक्यावर वही घेऊन चालत जाणे, लंगडी, चेंडू फेक, ड्रिबलींग द बॉल, सॅकरेस, रस्सीखेच, रिले ह्या स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना पदके व प्रशस्तिपत्रके देऊन कौतुक करण्यात आले. दोन वर्षांच्या कालावधी नंतर घेण्यात आलेल्या क्रीडादिनाचा मुलांनी मनसोक्त आनंद घेतला.

**राष्ट्रीय गणित दिवस**

भारताचे थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या स्मरणार्थ साजरा करण्यात येणारा 'राष्ट्रीय गणित दिवस' प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला.

शिक्षकांनी गणिताशी संबंधित वेगवेगळे उपक्रम इ. १ली ते ४थी च्या वर्गात राबविले. ते पुढीलप्रमाणे:-

- इ. १ली च्या विद्यार्थ्यांनी अंकांपासून वेगवेगळी चित्रे काढली.
- इ. २री च्या विद्यार्थ्यांनी बौद्धिक गणिताचे प्रात्यक्षिक केले.
- इ. ३री च्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ पदार्थांचा वापर करून ॲबेकस प्रतिकृती तयार केली.
- इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या आकृती-बंधांची सुंदर तोरणे तयार केली.

काही विद्यार्थ्यांनी माइकवरून सर्व विद्यार्थ्यांना गणिताचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, श्रीनिवास रामानुजन यांची माहिती सांगितली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी गणित कोड्यांचा आनंदही लुटला.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**डॉ. ज्योतिका ओझरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प जोशी - बेडेकर महाविद्यालयात संपन्न.**

दिनांक १९ जानेवारी २०२३ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय आणि 'डॉ. ज्योतिका ओझरकर विद्यार्थी मंच' यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ज्योतिका ओझरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांचे 'सत्ता, संस्कृती, भाषा...' या विषयावर व्याख्यान जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात पार पडले. माननीय प्राचार्या डॉ.सौ. सुचित्रा नाईक यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक करताना प्रा.अनुया गरवारे - धारप यांनी, 'ओझरकर बाईंचे आणि विद्यार्थ्यांचे जवळचे नाते होते, ज्याला कधीही पद आडवे आले नाही' असे सांगत, 'बाईंचे संस्कार, विचार आजही आमच्यासोबत आहेत' म्हणत बाईंच्या आठवणींना उजाळा दिला.

सी.एच.एम. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आणि आज प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून नावलौकिक मिळवलेल्या जुई गडकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बाईंचा आदरयुक्त दरारा होता हे सांगत, 'मी मराठी विषयाची विद्यार्थिनी नसतानाही त्यांच्या तासिकांना बसायचे आणि एखाद्या शिक्षकाच्या यशाचे गमक हेच आहे की, दुसऱ्या विभागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या

तासिकांना येऊन बसावेसे वाटणे यात आले'. असे सांगत ओझरकर बाईंच्या स्मृतींना उजाळा दिला.

जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'अशी काही व्याख्यानमाला सुरू करावी असे बाईंच्या विद्यार्थ्यांना वाटले, हे मला त्यांच्या यशाचे गमक वाटते. अनेक विद्यार्थी आपल्या हाताखालून जात असतात, पण अशी व्याख्यानमाला आयोजित करण्याचा विचार मनात यावा हा संस्कार मला महत्त्वाचा वाटतो. म्हणूनच या कार्यक्रमाबद्दल माझ्याकडे प्रस्ताव आला तेंव्हा मी लगेच होकार दिला. कारण विद्या प्रसारक मंडळ आणि जोशी - बेडेकर महाविद्यालय कायमच गुणीजनांचा आदर करण्यासाठी प्रसिद्ध आहे.' यावेळी नाईक मॅडम यांनी गणेश देवींच्या एका वाक्याची आठवण करून दिली की, जेंव्हा एखादी भाषा मरते तेंव्हा असे काही संपलेले असते की ज्याचे नुकसान दुसऱ्या कशानेही भरून येण्यासारखं नसते. एक - एक भाषा ही एक - एक झरोका आहे. म्हणून असे म्हणतात की, You can translate Words but You can't translate Culture. भाषेतील वैविध्य टिकावे, वृद्धिंगत व्हावे यासाठी असे कार्यक्रम व्हायला हवेत.

डॉ. नीतिन आरेकर यांनी कार्यक्रमाचे वक्ते प्रा. रंगनाथ पठारे सर यांचा परिचय करून दिला. यावेळी त्यांनी पठारे सरांची ओळख करून देताना, समाजातील सृजनशील, हळव्या मनाचे लेखक असून, दोन सहस्रकांच्या मधला सांधा जोडणारे, एवढेच नाही तर सांधा जोडल्यावर तिथे मुलामाही दिसणार नाही असे एका पिढीला दुसऱ्या पिढीशी जोडण्याचे काम प्रा.रंगनाथ पठारे सर यांनी केल्याचे अधोरेखित केले.

प्रा.रंगनाथ पठारे यांनी सत्ता, संस्कृती, भाषा या विषयाचे विवेचन करताना वाचक म्हणून निरीक्षक म्हणून मत मांडणार असल्याचे सांगत, 'जो सत्तेत असतो त्याच्याच ताब्यात संस्कृती असते आणि त्याचीच भाषा समजावर आरूढ होत असते. तो स्वतःचीच भाषा, संस्कृती, समाजावर लादत असतो, कारण त्यांना इतरांशी व्यवहार करायचे असतात सांगत संस्कृतीच्या प्रगत अवस्थेशी भौगोलिक केंद्रेही सतत बदलत असतात', याकडेही लक्ष वेधले.



'प्रमाणभाषा सूक्ष्मरित्या बदलतच रहाते. त्यासोबतच भाषेवर हुकूमत आणि प्रमाण भाषा आत्मसात करणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी रसद बोली भाषा पुरवत असतात. म्हणून बोली भाषांना कमी लेखू नये.' असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

अनेकांनी भाषेच्या गंजलेल्या अवस्थेत आपल्या शब्दांच्या ताकतीतून भाषेचा नवा परिचय करून दिला, याची आठवण करून दिली.

त्याचसोबत 'आज मध्यम वर्गाच्या मनात भय, धास्ती आहे, जी सामाजिक आरोग्यासाठी चांगली नाही, याची जाणीव करून देत या व्यवस्थेत बोलणं आणि लिहिण्यात निर्भयता असायला हवी' हेही समजावले. आपण बोलण्यातून, लिहिण्यातून, कृतीतून निर्भयता व्यक्त करणे हेच सद्य परिस्थितीला उत्तर असल्याचे सांगितले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पठारे सरांसोबत प्रश्नोत्तरी स्वरूपात संवाद साधला.

या कार्यक्रमाच्या वेळी शब्दालय प्रकाशनच्या सुमती लांडे व चित्रकार धनंजय गोवर्धने यांचा सन्मान

करण्यात आला. शब्दालय प्रकाशनातर्फे रसिकांसाठी कात्यायन सभागृहाबाहेर विविध पुस्तकांची उपलब्धता करून देण्यात आली होती. सदर व्याख्यानासाठी अनेक मान्यवर, साहित्यिक, प्रकाशक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

**शनिवार, २१ जानेवारी, २०२३ 'कौशल्य विकास आणि उद्योजकता' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद :**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात २१ जानेवारी २०३२ रोजी सकाळी ९.०० वाजता 'कौशल्य विकास आणि उद्योजकता कोश' व नवपरीवर्तन उद्भवन व अनुबंध विभाग मुंबई विद्यापीठ यांनी संयुक्तरित्या 'कौशल्य विकास आणि उद्योजकता' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेची थीम नवीन क्षितिजे वाढवणे ही होती. परिषदेची सुरुवात दीप प्रज्वलन करून तसेच परिषदेला लाभलेल्या प्रमुख पाहुण्या मीनल मोहाडीकर, अॅडा डिंडो (dyndo) यांचं श्रीफळ, शाल, मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. व्यासपीठावर उपस्थित प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक, अर्चना प्रभुदेसाई, अर्चना नायर यांचंही स्वागत करण्यात आले. तसेच कौशल्य विकास आणि उद्योजकता या परिषदेला लाभलेल्या अनेक प्रमुख मान्यवरांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. परिषदेच्या सूत्रसंचालिका सुजा अब्राहम या होत्या. तसेच अर्चना प्रभुदेसाई यांनी कौशल्य विकास आणि उद्योजकता या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदे बद्दल संपूर्ण दिवसात आयोजित करण्यात आलेल्या परिषदेची माहिती देत; स्टार्टअप, कौशल्य, उद्योजकता आणि विद्याध्यांसाठी येऊ घतलेल्या अनेक संधींची वाच्यता केली. तसेच जानेवारी २०२२ पासून या थीम अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. तसेच प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनीही मार्गदर्शन केले.

परिषदेला लाभलेल्या प्रमुख वक्त्या 'मीनल मोहाडीकर' या महाराष्ट्र आर्थिक काऊन्सिलच्या उपाध्यक्ष आणि संपादक आहेत. आयोजित परिषदेत 'नवीन क्षितिजे वाढवणे' या विषयावर बोलताना त्यांनी अनेक उद्योजकता क्षेत्रातील विषयांवर चर्चा केली. त्यानंतर परिषदेला लाभलेल्या दुसऱ्या प्रमुख वक्त्या कु. अॅडा डिंडो याही WICCI च्या भारत AEU व्यवसाय परिषदेच्या अध्यक्ष आणि प्राचार्या असून युरोपियन व्यवसाय आणि तंत्रज्ञान केंद्राच्या सल्लागार आहेत. त्यांनी महिला उद्योजकतेच्या दृष्टीकोनातून भारत – युरोपमधील व्यावसायिक संबंध या बद्दल माहिती दिली.

परिषदेच्या समन्वयक डॉ. अर्चना नायर यांनी उपस्थित प्रमुख वक्त्यांचे, शिक्षकांचे, सर्व मान्यवरांचे, विद्यार्थ्यांचे आणि स्वयंसेवकांचे आभार मानत ९.०० ते ११.३० दरम्यान असलेल्या पहिल्या सत्राची सांगता करण्यात आली.

तसेच आंतरराष्ट्रीय परिषदचे दुसरे सत्र सकाळी ११.३० ला सुरू झाले. पूर्ण सत्र या सत्राच्या सूत्रसंचालिका अंजली पुरंदरे या होत्या. या सत्राचे प्रमुख वक्ते श्री. लूक मार्श हे होते. साधना फॉरेस्ट येथील प्रकल्प संचालक, हैती, मेघालय आणि विरुद्धनगर येथील प्रकल्पांमध्ये ऑरोविल स्वयंसेवक म्हणून ते कार्यरत आहेत.

त्यानंतर परिषदेला लाभलेले वक्ते अध्यक्ष 'उदय वांकावाला' CEO, AIC हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी फाऊंडेशन मध्ये कार्यरत आहेत. यांनी देखील फार मोलाचे मार्गदर्शन केले.

पूर्ण सत्र । या सत्राची सांगता झरणा मॅम यांनी उपस्थित प्रमुख वक्ते, मान्यवर मंडळी यांचे आभार मानत केली.

दुसरे सत्र दुपारी १२.३० ला सुरू झाले. सूत्रसंचालिका झरणा तोलानी या होत्या. पॅनल चर्चा या सत्राचा विषय 'उद्योजकता आणि रोजगार क्षमतेसाठी भविष्यातील कौशल्ये' हा होता.

पॅनेलची चर्चा या सत्रासाठी व्यासपीठावर नियंत्रक म्हणून डॉ. नीतिन जोशी उपस्थित होते. आपल्या आपल्या क्षेत्रात कार्यरत असलेली मंडळी उपस्थित होती ती म्हणजे रिकेश गोरांग- भूतान असोसिएशनचे अध्यक्ष उद्योजक (B-Eyul), मिलिंद भोसले, सहाय्यक, प्रकल्प अधिकारी, MSSDS, शिवकला एस, संस्थापक, गोष्टी इ. आणि डॉ. ज्योती गोगटे, देआसरा फाऊंडेशनच्या मार्गदर्शक हे सदस्य उपस्थित होते.

सभागृहात उपस्थित मंडळींनाही या चर्चेत सामील करण्यात आले आणि त्यांच्या सोबत ही चर्चा झाली. पॅनल चर्चा सत्राची सांगता डॉ. झरना तोलानी यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानत केली.

ऑनलाईन स्वरूपात पॅनल चर्चा सत्राचे आयोजन देखील करण्यात आले होते. सदर ऑनलाईन चर्चा सत्राचे विषय, 'रोजगार क्षमतेसाठी संकेत वाचनाचे कौशल्य' असे होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. झरना तोलानी यांनी केली.

सत्राच्या शेवटी विद्यार्थी आणि मान्यवरांमध्ये 'उद्योजकता आणि करीयर' यावर प्रश्नोत्तरी सत्र पार पडले. ऑनलाईन पॅनल चर्चा सत्र हे ऑनलाईन स्वरूपात पार पडले व पूजा यांनी ऑनलाईन स्वरूपात उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे, विद्यार्थ्यांचे आभार मानत या सत्राची सांगता करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय परिषदचे चलचित्र संवाद दुसरे सत्र दुपारी ४.१५ ला सुरू झाले. 'चलचित्र संवाद' या सत्राचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. जिमी वाँग होते. तसेच जिमी चलचित्राच्या माध्यमातून उपस्थित मान्यवर, विद्यार्थ्यांशी ऑनलाईन स्वरूपात जोडले गेले होते.

या सत्राचे सत्कारकार डॉ. सुधाकर आगरकर हे होते आणि या सत्राबद्दल माहिती देत 'चलचित्र संवाद' या सत्राची सांगता करण्यात आली.

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयातील दुसरे सत्र दुपारी ४.३० ते ५.३० या वेळेत पार पडले.

जोशी बेडेकर महाविद्यालयातील उप-प्राचार्य सुभाष शिंदे यांनी प्रमुख अतिथी डॉ जानचाई यिंगप्रयुन यांचेही आभार मानत आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत दिवसभर पार पडलेल्या वेगवेगळ्या सत्रांबद्दल भाष्य केले. सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. तसेच ही परिषदेला पूर्णत्वास नेण्यासाठी लाभलेले सहकारी, आविष्कार मध्ये सिल्वर पदक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे आणि परिषदेला लाभलेल्या सर्वच सहकाऱ्यांचे मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आले.

संमेलनाच्या निमंत्रक डॉ.अर्चना प्रभुदेसाई यांनी 'कौशल्य विकास आणि उद्योजकता कोश' व नवपरीवर्तन उद्भवन व अनुबंध विभाग मुंबई विद्यापीठ यांनी संयुक्तरित्या 'कौशल्य विकास आणि उद्योजकता' या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत झालेले सर्व सत्र, लाभलेले प्रमुख पाहुणे, जोशी बेडेकर विद्यालयातील प्राचार्या, उप-प्राचार्य, मान्यवर, विद्यार्थी, प्रायोजक, शिक्षक, स्वयंसेवक, अशा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लाभलेल्या सर्वच सहकाऱ्यांचे आभार मानले आणि शेवटी पसायदानाने या परिषदेची सांगता करण्यात आली.

● **जोशी बेडेकर कला वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाच्या संस्कृत विभाग आणि सुरवाणी ज्ञान मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने भगवद्गीता श्लोक पठण स्पर्धेचे आयोजन दिनांक २४/०१/२०२३, मंगळवार**

**रोजी कात्यायन सभागृहात आयोजित केले होते. या वर्षी या स्पर्धेला पाच वर्षे पूर्ण झाली.**

या स्पर्धेत महविद्यालयीन विद्यार्थ्यांसह प्रथमच शालेय विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. एकूण २० वियार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला होता.

शालास्तरिय विद्यार्थ्यांना उत्कर्ष संस्कृत ई मासिकाची वार्षिक नोंदणी, तसेच शालेय उपयोगी वस्तू, मॅजेस्टिक बुक स्टोअरची कूपन आणि सोलर ट्रॉफी प्रथम तीन स्पर्धकांना देण्यात आली, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रथम २०००रु, द्वितीय १५००रु , तृतीय १०००रुपये, उत्तेजनार्थ ५०० रुपये आणि सोलर ट्रॉफी अशी प्रत्येकी तीन बक्षीसं देण्यात आली.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे उपस्थित होते, तसेच सूरवाणी सदस्य श्रीमती शिरीष अत्रे, मुख्याध्यापिका सौ. ऋतुजा वेलणकर, संस्कृत भारती ठाणे जनपद दायित्व असणारे श्री नारायण उपस्थित होते. शिंदे सरांनी स्पर्धेस अनेक शुभेच्छा दिल्या.



स्पर्धेत गीता धर्म मंडळच्या प्रमुख शिक्षिका आणि आय.आय.टी. पवई इथे कार्यरत असणाऱ्या सुश्री प्रियांका सलेकर यांनी निर्णायक म्हणून भूमिका पार पाडली.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचा प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे कायम मार्गदर्शन अनेकानेक शुभेच्छा प्राप्त होतात. तसेच प्रा. श्रेया मोघे यांनी स्पर्धेस आवश्यक ते सर्व सहाय्य केले.

विभाग प्राचार्यांसह इतर सर्व उप-प्राचार्य, तसेच सर्व मान्यवर शिक्षकांचे खूप आभार मानते आहे.

महाविद्यालयातील TYBAMMC चा विद्यार्थी अजिंक्य राज देवकर याची दि. २६ जानेवारी २०२३ रोजी दिल्ली येथे साजऱ्या केल्या जाणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात सादर केल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या चित्ररथातील कलाकार म्हणून निवड झाली. नारीशक्ती: 'महाराष्ट्रातील शक्तीपीठे' या विषयावर यावर्षी महाराष्ट्राचा चित्ररथ सादर केला.

तसेच प्रजासत्ताक दिन सोहळ्यानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय रंगशाळा शिबिरात अजिंक्य देवकरचा सहभाग असलेल्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चमूला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

**खेळ आणि आरोग्याची सांगड घालत माणसे सुद्धा जोडता आली पाहिजे – डॉ. महेंद्र महाजन**

दिनांक ४ फेब्रुवारी रोजी ठाण्याच्या जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या जिमखाना समितीतर्फे आयोजित वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी भूषविले, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित, तसेच हिमालयाची उंची गाठणारे गिनीज बुक विश्वविक्रम करणारे सायकलवीर, तसेच पेशाने डेंटिस्ट असलेले डॉ. महेंद्र महाजन होते. सदरचा कार्यक्रम हा महाविद्यालयातील कात्यायन सभागृहात पार पडला.

खेळ आणि आरोग्याची सांगड घालत असताना माणसे जोडण्याची कलादेखील आपण जोपासली पाहिजे असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे डॉ. महाजन यांनी केले.

खेळामधील विविध विश्वविक्रम पादाक्रांत करत

असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते अशा प्रसंगी आपल्या मदतीला आपलेच मित्र येऊ शकतात. त्यामुळे जीवनामध्ये आपण चांगले मित्र आणि माणसे जोडणे महत्त्वाचे असते असेही ते म्हणाले.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळाचे महत्त्व समजावून उत्तम खेळाडू कसे व्हावे याबद्दल मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील क्रीडा कामगिरीचे भरभरून कौतुक केले. त्यानंतर जिमखाना समिती प्रमुख डॉ. प्रमोद खराटे यांनी क्रीडा विभागाचा वर्षभराचा अहवाल कार्यक्रमात वाचून दाखवला.

आपल्या भाषणामध्ये डॉ. महाजन यांनी एक नवीन विश्वविक्रम करत काश्मीर ते कन्याकुमारी असे ३८५० किलोमीटर अंतर १० दिवस ११ तासात कसे पूर्ण केले याबद्दलचा, तसेच 'टूर ऑफ ड्रॅगन' आणि 'रेस अक्रास अमेरिका' सायकलिंगचा रोमांचक अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथित केला व त्यांना प्रेरित केले.

पंढरपूर ते गुमान (पंजाब) अशी २१ दिवसांची सायकलवारी करणारे महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमांमध्ये कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या वर्षभरामध्ये राज्य, राष्ट्रीय आणि विद्यापीठीय स्तरावर क्रीडा विषयक नेत्रदीपक कामगिरी करत महाविद्यालयाला लौकिक मिळवून दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्ती प्रमाणपत्र व सुवर्ण, कांस्य व रौप्य अशा तीन प्रकारची पदके वितरित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यामध्ये कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांना 'बेस्ट स्पोर्ट्स पर्सन ऑफ द इयर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सदरच्या कार्यक्रमांमध्ये व्यासपीठावर महाविद्यालयाचे सर्व उप-प्राचार्य, प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, प्रा. संगीता दीक्षित, पर्यवेक्षिका प्रा.छाया कोरे, तसेच डॉ. अनिल ढवळे, डॉ. दीपक साबळे, प्रा. संतोष राणे, प्रा. नीतिन वाढविन्दे, डॉ. प्रकाश जंगले, प्रा. प्रफुल भोसले, सर्व क्रीडा प्रशिक्षक, विद्या प्रसारक मंडळाच्या क्रीडा प्रबोधिनीचे समन्वयक सुदर्शन जोशी, विभाग प्रमुख, समन्वयक, शिक्षक गण, जिमखाना विद्यार्थी सचिव दुर्वेश तनपुरे, खेळाडू व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या यशामध्ये क्रीडा शिक्षक रोहिणी डोंबे, जिमखाना समितीचे सर्व सदस्य, कर्मचारी श्री. राकेश बाईंग, श्री. विजय पाटील व श्री. विक्रांत, तसेच विद्यार्थ्यांनी मोलाचा हातभार लावला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी कुलकर्णी, तसेच देवयानी पाटील यांनी केले; तर आभार रोहिणी डोंबे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता दुपारी १.३० वाजता पसायदानाने झाली.

आपल्या महाविद्यालयातील BAMMC विभागातील प्राध्यापक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी ५ फेब्रुवारी रोजी वर्धा येथे संपन्न झालेल्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात, **'गांधी आणि विनोबा आजच्या परिप्रेक्षात'** या विषयावर निमंत्रित वक्ता म्हणून व्याख्यान दिले.



जोशी बेडेकर कला वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालयाच्या संस्कृत विभागा तर्फे दि. २/०२/२०२३, गुरुवार ते ६/०२/२०२३ सोमवार पर्यंत नागपूर जवळील रामटेक येथील कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक येथे अभ्यासिका सहलीचे आयोजन केले होते. यात एकूण २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांना भेट, ग्रंथालय भेट, आयुर्वेद पंचकर्म चिकित्सा पद्धती, योग विभाग, योग सेशन, हस्तलखित वाचन, ते कसे जतन करून ठेवतात; तसेच त्यांचे वाचन संशोधन कसे होते याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना बघायला मिळाले.

तसेच विद्यार्थ्यांनी तेथील आयोजित धिषणा परिषदेत देखील सहभाग घेतला, आणि ही परिषद कशी होते त्यातील विद्यार्थी भाषणाची तयारी कशी करतात किंवा एखाद्या विषयावर संशोधन कसे करावे, सहभागी विद्यार्थ्यांना विद्वान् कसे प्रश्न विचारतात, विद्यार्थी कशा प्रकारे त्याला सामोरे जातो या सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव आमच्या विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतला. तसेच मेघदूत ज्या ठिकाणी रचल्या गेले त्या कालिदास स्मारकाला देखील विभागाने भेट दिली.

रामगिरी पर्वतावरील रामायण कालीन पुरातन राममंदिर देखील बघितले. परतीच्या वाटेवर श्री संत गजानन महाराज मंदिर-शेगाव येथे जाऊन श्रींचे दर्शन देखील घेतले.



संस्कृत विभागाच्या विद्यार्थ्यां एक नवीन अनुभव आणि अभ्यासाला तसेच त्यांच्या करियरच्या दृष्टीने दिशा देणारी ही अभ्यासिका सहल होती. विद्यार्थ्यांनी या सहलीचा पुरेपूर आनंद घेतला. स्वाती भालेराव आणि श्रेया मोघे यांनी या यात्रेची संपूर्ण धुरा सांभाळली.

ही अभ्यासिका सहल यशस्वी होण्यास प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले आणि सहाय्य केले त्यासाठी विभाग त्यांचे कायम ऋणी राहील.

इतर सर्व उपप्राचार्य, सर्व समन्वयक तसेच सर्व प्राध्यापक वृंदाचे अनेक धन्यवाद!

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

दिनांक १/२/२०२३ रोजी (MSBTE Maharashtra State Board of Technical Education) मधील सेवानिवृत्त उपसचिव डॉ. एस.एम.एस. शशीधरा यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला सदिच्छा भेट दिली. सिव्हिल इंजिनिअर असलेल्या प्रोफेसर शशीधरन यांनी त्यांच्या कारकीर्दीची माहिती दिली. प्राचार्य डॉ.डी. के.नायक यांच्याशी त्यांचा जुना सस्नेह संबंध आहे. त्यांच्या सदिच्छा भेटीत तंत्रनिकेतनातील विभाग प्रमुख व इतर सिनिअर स्टाफ उपस्थित होते. आपल्या कारकीर्दीतील विविध अनुभव या सदिच्छा भेटीत व्यक्त केले.




## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

६ आणि ७ जानेवारी : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स च्या विद्यार्थी विकास समितीने (SDC) एन्थुझिया ३.०, या आंतर महाविद्यालयीन व्यवस्थापन महोत्सवाचे (मॅनेजमेंट

फेस्ट) आयोजन केले. या मध्ये एकूण १२ कार्यक्रमांमध्ये १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

श्री. वैभव पंडित यांना विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या निवडीसाठी तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

९ जानेवारी : प्रा. विभूती सावे यांचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठीचे वर्ल्ड क्लास मॅन्युफॅक्चरिंग हे पुस्तक विकास पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित झाले.




१२ जानेवारी : राष्ट्रीय युवा दिनी (१२.०१.२०२३), ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे नावीन्यपूर्ण युवा प्रतिभा विकसित करण्यासाठी कल्पना जाणून घेऊन व नावीन्यपूर्ण मार्ग तयार करून ते प्रदर्शित करणाऱ्या 'व्हिजनरी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

१२ जानेवारी : प्रा. कृष्णकांत लसुणे, पॅसिफिक युनिव्हर्सिटी आणि एमइटी आयओएम (MET IOM) द्वारे आयोजित बिझनेस डेटा ॲनालिटिक्स या विषयावरील एका आठवड्याच्या प्राध्यापन विकास कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

१२ – २० जानेवारी : डॉ. कांचन यांनी द्वितीय वर्षाच्या विपणन शाखेच्या खालील विद्यार्थ्यांना नामांकित केले ज्यांनी एऑन रिसर्च लिमिटेड सोबत एक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला. या विद्यार्थ्यांनी आय ट्रॅकिंगची संकल्पना शिकून आणि त्याची अंमलबजावणी करून P & G कंपनी साठी एका प्रकल्पावर काम केले.

i) लीना शेलार, ii) श्रद्धा रावले, iii) तन्वी कदम, iv) संध्या सिंग, v) उन्नती मेहंथी, vi) संजना शिंदे, vii) कादंबरी कावळे, viii) श्रुती जगदाळे.

१४ जानेवारी : एमएमएस च्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी वैष्णवी के. पाटील आणि तेजश्री जी. मोकाशी यांनी सस्मिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन बिझनेस केस स्टडी स्पर्धेत पहिले पारितोषिक पटकावले. संघाचे मार्गदर्शन डॉ. कांचन अक्षय यांनी केले.

१४ जानेवारी : प्रा. कृष्णकांत लसुणे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.एन. बांदोडकर महाविद्यालय (ठाणे) येथे झालेल्या उपयोजित गणित विषयावरील राष्ट्रीय परिषदेत एमएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी हेमांगी पोस्ती, अंजली पाल आणि जुई शिंदे यांनी संशोधन भित्तीपत्रिका सादरीकरण (research poster presentation) स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकावले.



१८ जानेवारी : प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्राम अंतर्गत सिंगापूर येथील इ आर सी (ERC) संस्थेचे शैक्षणिक प्रमुख – गोह जॉन कीट, यांची १ली कार्यशाळा दूरस्थ माध्यमाद्वारे (ऑनलाईन) आयोजित केली आणि त्याचे समन्वयन केले.

१८ जानेवारी : प्रा. संदीप मोघे, एक्स्चेंज प्रोग्राम अंतर्गत सिंगापूर येथील इ आर सी (ERC) संस्थेच्या

''मॉनेटरी पॉलिसी ओव्हरव्ह्यू अँड सिंगापूर मॉनेटरी टूल'' या विषयावरील कार्यशाळेला दूरस्थ माध्यमाद्वारे (ऑनलाईन) उपस्थित राहिले.

१९ जानेवारी : ब्रिम्स च्या आय आय सी समिती तर्फे ''बिझनेस मॉडेल इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी'' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना हिरांदानी इस्टेट विभागाच्या रोटरी क्लब तर्फे मिस्टर अँड मिसेस RYLA (रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड्स) चे विजेतेपद जिंकण्याची सुवर्ण संधी मिळाली.



२० जानेवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी आयआयटी मुंबई येथे बीएमए तर्फे आयोजित डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या विषयावरील परिषदेत भाग घेतला.

२१ जानेवारी : ब्रिम्सच्या सीएसआर समिती तर्फे रोटरी क्लब ठाणे मेट्रोच्या सहकार्याने 'कॉर्पोरेट कनेक्ट आणि प्लेसमेंट मार्गदर्शन' या विषयावर सत्र आयोजित करण्यात आले.


२१ जानेवारी : डॉ. कांचन यांनी मानव संसाधन शाखेच्या ३ एचआर विद्यार्थ्यांना ''डीकोडिंग बिझनेस अँड पीपल- इंडिया २०२३'' या विषयावरील (एचआर कॉन्फरन्स) परिषदे मध्ये भाग घेण्यासाठी नामांकित केले व झेवियर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे पाठवले.




२१ जानेवारी : प्रा.सिद्धेश सोमण यांनी के.जे.सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (SIFICO-2023) च्या आंतरराष्ट्रीय वित्त परिषदेत ''इफ्फेक्ट ऑफ कोविड-१९ ऑन हर्ड बिहेविअर इन इंडियन लार्ज-कॅप इक्विटीज'' हा त्यांचा शोधनिबंध सादर केला.

२१ जानेवारी : डॉ.पंकज नांदूरकर, सहाय्यक प्रा. विभूती सावे, सहाय्यक प्रा. जान्हवी पोतदार, श्री. चैतन्य पवार यांनी ' स्किल डेव्हलपमेंट अँड एन्त्रेप्रेनरशिप : स्केलिंग न्यू होरायझन्स' या विषयावरील एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहिले.

२५ जानेवारी : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स तर्फे थायलंडच्या थक्सिन विद्यापीठ, फाथलुंग चे प्राध्यापक डॉ. जानचाई यिंगप्रयुन, यांची ''एन्त्रेप्रेनरशिप स्किल अटीट्युड अँड बिहेविअर डेव्हलपमेंट'' या विषयावर आधारित एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



२२ जानेवारी : भारत सरकारच्या योग प्रमाणन मंडळ, द्वारे मान्यता प्राप्त अग्रगण्य योग संस्था श्री अंबिका योग कुटीर, ठाणे तर्फे आयोजित केलेल्या प्रथम स्तर योग प्रशिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी 'पतंजली योग-सूत्रे' या विषयावर दूरस्थ माध्यमाद्वारे (ऑनलाइन) अतिथी सत्र आयोजित केले.

२५ जानेवारी : डॉ. पल्लवी चंदवासकर यांचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, स्कूल ऑफ ओपन लर्निंग एमबीए चे द्वितीय वर्ष, ४थ्या सत्रासाठीचे ''लॉंचिंग न्यू प्रोडक्ट अँड सर्व्हिसेस'' हे पुस्तक विकास पब्लिकेशन तर्फे प्रकाशित झाले.




२८ जानेवारी : एमएमएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी अंजली पाल आणि सोनाली पानपाटील यांनी मालाड (प.) येथील एम.डी.शहा महाविद्यालयातर्फे आयोजित कॉर्पोरेट बोन्साय कार्यक्रमातील 'ब्रेन फ्रीझ' या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.



२८ जानेवारी : प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी जैन युनिव्हर्सिटी, बंगळुरू तर्फे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत ''गुंतवणूक निर्णय घेण्यावर आर्थिक साक्षरतेच्या अभावाचा परिणाम'' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

३० जानेवारी : विद्या प्रसारक मंडळाच्या प्रांगणात हिराली फाऊंडेशन तर्फे आयोजित ''नो हॉर्न'' उपक्रमात डॉ. नीतिन जोशी सहभागी झाले.

**डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था – ग्रंथालयाची माहिती**

- ग्रंथालयामार्फत डिसेंबर या महिन्यात एकूण ५९ नवीन पुस्तके घेण्यात आली तसेच सदस्यत्त्व असलेल्या नियतकालिकांमधील ७६ लेखांचे कोहा या ग्रंथालय प्रणाली मध्ये तालिकीकरण करण्यात आलेले आहे. हे सर्व लेख ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सर्व नियतकालिके आणि माहितीसंग्रह हे ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. opac.vpmthane.org:50400

- जानेवारी या महिन्यामध्ये शिक्षक, कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थी यांनी मिळून १२२५ पुस्तकांची देवाणघेवाण केली त्यामध्ये

  १) देवघेव केलेली पुस्तके : ४९६

  २) नूतनीकरण केलेली पुस्तके : २७१

  ३) परत आलेली पुस्तके : ४५८


- सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापर-कर्ता :

जानेवारी २०२३ मध्ये सर्वाधिक पुस्तके घेणारे सभासद

१) प्राध्यापक : प्रा. जान्हवी पोतदार – २९ वेळा

२) विद्यार्थिनी : स्वाती सत्यनारायण जव्हार (V36) – २४ वेळा

**निम्ब्स या प्रणालीचा वापर करून** EBSCO eBooks **या माहिती संग्रहाचा विषयानुसार केलेला वापर**





**प्रकाशकानुसार व विषयानुसार मोबाईल ॲपच्या माध्यमातून केलेला वापर**







m-Library **मोबाईल अँप चा जास्तीत जास्त वापर करणारे विद्यार्थी**




## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय वेळणेश्वर

दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रा.योगेश काटदरे यांनी वराडकर कनिष्ठ महाविद्यालय, दापोली, जिल्हा रत्नागिरी येथे बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी या विषयावर विशेष व्याख्यान दिले. प्रा. काटदरे यांनी विद्युत सुरक्षेचे महत्त्व, त्याची आवश्यकता, ते कसे मिळवायचे, विजेपासून सुरक्षितता, विद्युत अपघात, ओव्हरहेड ग्राउंड वायर आणि लाइटनिंग अरेस्टर्स इत्यादी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला ३० विद्यार्थी उपस्थित होते.



दिनांक १३ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाच्या प्रा.मीना कश्यप यांनी पेटंट मिळविण्यात यश मिळविले. त्यांना 'लहान आणि मोठ्या उद्योगांसाठी जोखीम कमी करणारे उपकरण' या विषयावर पेटंट मिळाले आहे. लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. गेल्या काही दशकांमध्ये लोकांना कामावर आणि घरी आराम करण्यास मदत करण्यासाठी खूप अशा मशिन्स बनवल्या आणि डिझाईन केल्या गेल्या. मशीनमुळे लोकांचे गंभीर शारीरिक नुकसान झाले. प्रसंगी त्यांचे प्राणही गेले आहेत. अशा परिस्थितीत लोकांचे जीवन अधिक सुरक्षित करण्यासाठी या शोधाचा वापर मशिन्सच्या सहाय्याने केला जाणार आहे. सदर पेटंट 'इंडियन पेटंट ऑफिस' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाला.

दिनांक १६ व १७ जानेवारी २०२२ रोजी यंत्र अभियांत्रिकी विभागाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य जयंत कयाळ, डॉ.ए.बी. मुखर्जी आणि डॉ. मूर्ती या तीन मान्यवरांनी दि. १६ जानेवारी रोजी यंत्र अभियांत्रिकी आणि स्थापत्य अभियांत्रिकी विभागाला भेट दिली. प्रयोगशाळा बघून काही बदल सुचवले आणि शिक्षकांशी संवाद साधला. तसेच दि.१७ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी तीन व्याख्याने आयोजित केलेली होती. यामध्ये डॉ.ए.बी. मुखर्जी यांनी पहिल्या सत्रात Design of Mechanical Components या विषयावर तर दुसऱ्या सत्रात Design of Mechanical Systems या विषयावर व्याख्यान दिले. त्याचप्रमाणे डॉ. मूर्ती यांनी पहिल्या सत्रात 'Vibration : शाप की वरदान' या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी प्रथम वर्ष अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी आणि स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील मिळून एकूण ४५ विद्यार्थी आणि १० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी

उपस्थित होते. त्यानंतर दुपारच्या सत्रात ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अंतिम वर्ष अभियांत्रिकी प्रोजेक्टसाठी आवश्यक मार्गदर्शक केले. तसेच BARC मधील नोकरीच्या संधी व इतर क्षेत्रातील नोकरीच्या संधी यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर जेष्ठ शास्त्रज्ञ समितीच्या सदस्यांनी शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी External Audit, IQAC, Google Classroom इ. विषयांवर चर्चा झाली.



दिनांक १६ ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीत महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभाग व इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागातील विद्यार्थ्यांनी कॉलेज ऑफ इंजीनिरिंग पुणे (COEP) येथे इंटर्नशिप पूर्ण केली. या इंटर्नशिप मध्ये एकूण दहा विद्यार्थ्यांचा समावेश होता. या दरम्यान विद्यार्थांना अद्ययावत अशा प्रयोगशाळांमध्ये प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. यावेळी प्रा. डॉ. सुधीर आगाशे, श्री. आमोद हरणखेडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र सोनी व उपप्राचार्य श्री. अविनाश पवार यांच्याकडून मोलाचे मार्गदर्शन लाभले.




दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग आणि Institution's Innovation Council यांच्या संयुक्त विद्यमाने Design Thinking, Critical Thinking and Innovation Design या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेसाठी थायलंड येथील Dr.Janchai Yingprayoon मार्गदर्शक म्हणून लाभले.

Dr.Janchai यांनी भौतिक शास्त्रातील संकल्पना छोट्या छोट्या प्रयोगांतून स्पष्ट केल्या. Screw Design चा हेलीकॉप्टर मधील उपयोग, Internal Combustion चा Diesel Engine मधील वापर, Doppler Effect, Parallax या संकल्पना स्पष्ट केल्या. तसेच छोट्या छोट्या कल्पनांचे, वैज्ञानिक संकल्पनांचे एकत्रीकरण करून काहीतरी नवीन वैशिष्ट्यपूर्ण करण्यासाठी वापरले जाणारे SCAMPER TECHNIQUE स्पष्ट केले. हे Technique सर्जनशील क्षेत्रात जसे नवीन शोध लावण्यासाठी, Fashion Designing क्षेत्रात, दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी वापरले जाते. या कार्यशाळेसाठी ४७ विद्यार्थी आणि १३ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



दि. २४ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभाग आणि संस्थात्मक इनोव्हेशन कौन्सिल (IIC) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'प्रदूषण नियंत्रण' या विषयावर तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी श्री. अमर काटकर यांना प्रमुख वक्ते म्हणून

आमंत्रित करण्यात आले. त्यांनी प्रदूषण नियंत्रण व वातावरण आणि सजीवांवर होणाऱ्या प्रदूषणाच्या परिणामांची सर्व माहिती यावेळी दिली. तसेच प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने केलेल्या सर्व नियमांची माहिती सांगितली.



महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील श्री. गणेश आनंदराव दिवे यांना डॉक्टरेट पदवी प्राप्त झाली आहे. त्यांना नुकतेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कडून इंग्रजी विषयात विद्या वाचस्पती पदवी बहाल करण्यात आली. त्यांच्या संशोधन प्रबंधाचे शीर्षक Fantasy Satire in the Select Novels of Terry Pratchett : Study असे आहे. डॉ. गणेश दिवे यांनी टेरी प्रॅचेट या ब्रिटिश लेखकाच्या डिस्कवर्ल्ड कादंबरांच्या मालिकेतील काल्पनिक घटक व उपहास बाबत अभ्यास करून दोन शोधनिबंध सुद्धा प्रकाशित केले. या संशोधनातून काल्पनिक कथा, कादंबऱ्यांच्या वाचकांना प्रेरणा मिळेल व लेखक काल्पनिक घटकांचा वापर करून समाजप्रबोधन कसे करतो याचेही आकलन करता येईल.

दि. ३० जानेवारी २०२३ रोजी यंत्र अभियांत्रिकी विभागाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ समिती अंतर्गत वेबिनारचे आयोजन केले गेले. श्री. संतोष कारखानीस यांनी project management या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. श्री. कारखानीस यांनी Project Management वर प्रेझेंटेशनच्या सहाय्याने विस्तृत माहिती सांगितली. हा विषय अंतिम वर्षाच्या अभ्यासक्रमाला असल्याने विद्यार्थ्यांना त्याचा नक्कीच फायदा झाला.

दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभाग व संस्थात्मक इनोव्हेशन कौन्सिल (IIC) यांच्या द्वारे 'उद्योजकता कौशल्य, वृत्ती आणि वर्तन विकास' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी श्रीमती दीपाली केळकर (सुप्रसिद्ध लेखिका, अँकर, व्याख्याता) यांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले. सदर कार्यशाळेमध्ये महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी आणि सर्व शाखांचे विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. यावेळी श्रीमती केळकर यांनी प्रश्नोत्तरे आणि संभाषण पद्धतीत उत्कृष्ट व्याख्यान दिले. यामध्ये चांगल्या सवयींचे महत्त्व, आपले वैयक्तिक आणि सामाजिक वर्तन कसे सुधारावे, आपण आपले व्यक्तिमत्त्व कसे सुधारू शकतो, आपल्या दैनंदिन जीवनात सामंजस्याचे महत्त्व काय आहे हे त्यांनी यावेळी सांगितले.



•••


दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**संपर्क**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.